मेहता मराठी ग्रंथजगत

जुलै, २०२३
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष तेविसावे
अंक सातवा

मनोहर माळगांवकर

जयंती : १२ जुलै, १९१३

स्मृतिदिन : १४ जून, २०१०

पुरस्कारासाठी आवाहन

'मेहता पब्लिशिंग हाऊस'चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'** देण्यात येणार आहे. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत केली गेली.

या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

'प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार'

सर्वोत्कृष्ट कादंबरी
३०,०००/-

सर्वोत्कृष्ट कथासंग्रह
२०,०००/-

पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१. १ जानेवारी, २०२३ ते ३० सप्टेंबर, २०२३ दरम्यान प्रकाशित झालेली पहिली साहित्यकृती या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

२. १ ऑक्टोबर, २०२३ ते १ नोव्हेंबर, २०२३ या कालावधीत पुरस्कारासाठीचे अर्ज स्वीकारण्यात येतील.

या पुरस्काराची घोषणा जानेवारी २०२३ मध्ये केली गेली असून १२ जानेवारी, २०२४ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे. तरी इच्छुक साहित्यिकांनी आपले साहित्य मेहता पब्लिशिंग हाऊसच्या पत्त्यावर पाठवावे.

मेहता मराठी ग्रंथजगत

◆ जुलै २०२३ ◆ वर्ष तेविसावे ◆ अंक सातवा

संपादक :
अखिल मेहता

संस्थापक संपादक :
शंकर सारडा

अंकाची किंमत १५ रु.
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.

प्रसिद्धी :
दरमहा ११ तारखेस

मांडणी-अक्षरजुळणी

मेहता पब्लिशिंग हाऊस

– अनुक्रमणिका –

संपादकीय	**४**
पुरस्कार	**८**
प्रकाशन	**१०**
विशेष लेख	**१६**
पुस्तकाच्या पानांतून	
इश्क @ मांडवी	२०
राझ महाल	२२
नथिंग व्हेंचर्ड	२६
सेल	३२
द गर्लफ्रेंड	३४
भटक्याचं भारूड	३८
बंद दरवाजा	४८
अभिप्राय	**५६**
दिनविशेष	**६०**

संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ । E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.

संपादकीय

मनोहर माळगांवकर आता मेहतांच्या सूचीत

भारतीय भाषांत विविधांगी लेखन करणारे लेखक-लेखिका आपल्याला माहिती असतात. मातृभाषेत व प्रादेशिक भाषेत लेखन ही त्यांची प्रामुख्याने ओळख असते. त्याचप्रमाणे इंग्रजीत लेखन करणारे अनेक भारतीय लेखक आहेत. त्यांतील एक महत्त्वाचे नाव म्हणजेच मनोहर माळगांवकर. इंग्रजीत लेखन करणारे साहित्यिक म्हणून ते परिचित आहेत. कादंबरीकार व इतिहासकार म्हणून त्यांची विशेष ओळख आहे.

मूळचे कर्नाटकातील बेळगावचे असणारे मनोहर माळगांवकर यांचे आजोबा मध्यप्रदेशातील देवास संस्थानाचे राज्यपाल होते. त्यामुळे बालपणापासून त्यांना संस्थानी वातावरण व रीतिरिवाज यांचा परिचय झाला. त्याचेच बहुतांशी चित्रण त्यांच्या साहित्यात केले गेलेले पाहायला मिळते. भारतीय सैन्यात दाखल झालेले माळगांवकर 'मराठा लाईव्ह इन्फट्री'मध्ये 'लेफ्टनंट कर्नल'च्या पदावर कार्य करत होते. सैन्यातून त्यांनी स्वेच्छा निवृत्ती घेतली व खाणीचा व्यवसाय सुरू केला. पुढे शेती व लेखन यांतच त्यांनी पूर्ण लक्ष केंद्रित केल्याचे पाहायला मिळते. ते अखेरपर्यंत कर्नाटकात दांडेली अभयारण्याजवळच्या 'जुगलपेठ' येथे राहत होते.

'दि स्टेट्समन' आणि 'डेक्कन' या इंग्रजी वृत्तपत्रांत त्यांनी विविध विषयांवर स्तंभलेखन केले. त्यांचे स्तंभलेखन वाचकप्रिय होते. कथा, कादंबऱ्या, चरित्रे व ललित लेखनासोबतच वृत्तपत्रीय स्तंभलेखन त्यांनी विपुल प्रमाणात केले. त्यांची 'A Bend In The Ganges' व 'The Men Who Killed

Gandhi' ही पुस्तके विशेष गाजली; पण त्यांची खरी ओळख 'द प्रिन्सेस' या कादंबरीमुळे लोकांना झाली. येत्या काळात आमच्या प्रकाशनसंस्थेमार्फत 'द प्रिन्सेस' हे भा. द. खेर अनुवादित पुस्तक, तसेच 'कान्होजी आंग्रे' हे अनुवादित पुस्तकही लवकरच नवीन स्वरूपात प्रकाशित होत आहे.

मनोहर माळगांवकर हे नाव आता 'मेहता पब्लिशिंग हाऊस'च्या समृद्ध ग्रंथसूचीत नुकतेच सामील झाले आहे, याचा आम्हाला सार्थ अभिमान वाटतो. भा. द. खेर यांनी अनुवादित केलेले 'वादळवारा' व श्री. ज. जोशी अनुवादित 'इथे थबकली गंगामाई' ही पुस्तके नुकतीच आम्ही प्रकाशित केली आहेत. मूळ इंग्रजीत असणारी ही पुस्तके स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतात असणाऱ्या समाजजीवनावर प्रकाश टाकतात. 'वादळवारा'मध्ये शेवटचा पेशवा नानासाहेब पेशवा यांनी ब्रिटिशांविरोधात दिलेला लढा व संघर्ष याचं अस्सल चित्रण पाहायला मिळतं. 'इथे थबकली गंगामाई' या कादंबरीत स्वातंत्र्यपूर्व काळातील भारतीय स्वातंत्र्यलढा व त्याचा समाजमनावर झालेला परिणाम यांचे चित्रण केलेले आढळते. इंग्रजीत लेखन करून आपला अमीट ठसा उमटवणारा एक भारतीय लेखक म्हणून मनोहर माळगांवकर हे नाव आपसूकच आपल्याला सशक्त साहित्यिक म्हणून एक वेगळी ओळख व आठवण कायमच करून देत असते.



मेहता मराठी ग्रंथजगत

नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी
आजच वर्गणीदार व्हा.

आमच्या छापील अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये

डिजिटल अंकाची वर्गणी

त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये
पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये

Available on

amazonkindle | Google Play Books

Find us on: facebook®

https://www.facebook.com/mehtapublishinghouse

मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा.
आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके
निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य,
निम्म्या किंमतीत
मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!

₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx



नाहीत स्कॅन केलेली पाने
किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच,
खरीखुरी **eBooks**
युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर –
थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड,
किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

available on :
ebook

amazonkindle | Get it on Apple Books | Google Play Books

पु

र

स्का

र

'लोकनेते भाई वैद्य युवानेता पुरस्कार'

'भाई वैद्य फाउंडेशन' व 'आरोग्य सेना, पुणे' यांच्यातर्फे दिवंगत समाजवादी नेते भाई वैद्य यांच्या जन्मदिनानिमित्त 'लोकनेते भाई वैद्य युवानेता पुरस्कार २०२३' हा आपले लेखक हॉर्वर्ड विद्यापीठ स्कॉलर-डॉ. सुरज एंगडे यांना जाहीर करण्यात आला. दिनांक २२ जून, २०२३ रोजी ज्येष्ठ विचारवंत व लेखक डॉ. रावसाहेब कसबे यांच्या हस्ते हा पुरस्कार त्यांना प्रदान करण्यात आला.

◆

कास्ट मॅटर्स

डॉ. सुरज मिलिंद एंगडे

अनुवाद

प्रियांका तुपे, प्रणाली एंगडे

जातीबाबत खोलवर रुजलेल्या भावना आणि विषमतामूलक व्यवस्थेचं परखड परिक्षण... पहिल्या पिढीचे दलित अभ्यासक सुरज एंगडे यांचं धाडसी आत्मकथन



किंमत : ४६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

आय कॅन सी यू

करेन रोझ

अनुवाद

पराग पोतदार

TBC - 32 Book No. 6

आभासी जगातला रोमॅण्टिसिझम आणि वास्तव जगातलं क्रौर्य यांचा थरकाप उडवणारा मिलाफ मांडणारी थरारक कादंबरी

किंमत : ९९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

वादळवारा

मनोहर माळगांवकर

अनुवाद

भा. द. खेर



जुलमी इंग्रजी सत्तेलाही भयग्रस्त करत, १८५७च्या उठावात स्वातंत्र्याच्या स्वप्नांची पेरणी करणाऱ्या नानासाहेब पेशव्यांच्या जीवनाची रंजक कहाणी

किंमत : ४९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

प्र

का

श

न

'उपरा'कारांची तीन महत्त्वाची पुस्तके नव्या रूपात वाचकांच्या भेटीस!

पुणे- उपेक्षित घटक असो वा भटक्या-विमुक्त समाजाचे विविध प्रश्न, आपल्या लेखणीतून त्यावर परखडपणे भाष्य करून ते प्रश्न ऐरणीवर आणणारे लेखक म्हणजे 'उपरा'कार लक्ष्मण माने. यांच्या साधारण दोन दशकांहून अधिक काळ आउट ऑफ प्रिंट असलेल्या पुस्तकांपैकी 'उद्ध्वस्त' हा कथासंग्रह, 'यशवंतराव चव्हाण : आठवणी आणि आख्यायिका' हा पत्रसंग्रह व 'विमुक्तायन' हा संदर्भग्रंथ या तीनही पुस्तकांच्या सुधारित नवीन आवृत्त्या अलीकडेच 'मेहता पब्लिशिंग हाऊस' कडून प्रकाशित झाल्या आहेत. या तीन पुस्तकांच्या प्रकाशन सोहळ्याच्या निमित्ताने आपले लाडके लेखक लक्ष्मण माने वाचकांच्या भेटीला आले होते. हा कार्यक्रम २९ जून रोजी ५ वाजता गणेश हॉल, न्यू इंग्लिश स्कूल, पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्यास अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी संमेलनाध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस, ज्येष्ठ पत्रकार अरुण खोरे, ज्येष्ठ पत्रकार व लेखक मनोहर सोनवणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती. मेहता पब्लिशिंग हाऊसचे साहिल मेहता व रूपा मेहता यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अक्षय वाटवे यांनी केले, तर प्रास्ताविक प्रतीक येतावडेकर यांनी केले.

लेखक लक्ष्मण माने सुरुवातीला म्हटले की 'आपण स्वत:ला चिमटा काढून विचारायला हवं की आपण जिवंत आहोत का? आणि जर आपण आपल्या सभोवतालाबाबत संवेदनशील असू तरच आपण जिवंत आहोत, असे समजावे.' आजच्या एकंदरीत सभोवतालावर भाष्य करताना सुरुवातीला 'जर वाचणारेच नसतील तर आपण लिहायचे कुणासाठी?'





'आपली तरुणाई कुठे चालली आहे?' असे अनेक सवाल तर 'आपण एका विपरीततेकडे चाललो आहोत' 'आपण मुर्दाड झालो आहोत' अशी खंत त्यांनी व्यक्त केली; परंतु सोबतच एका बाजूने बरीचशी तरुणाई वाचनाकडे वळते आहे म्हणून मी लिहीत राहीन, असे आशादायी वक्तव्यही केले.

मनोहर सोनवणे यांनी आपल्या मनोगतातून सांगितले, की १९७० ते ८०च्या दशकात उपेक्षितांचं जगणं फारच प्रखरपणे जगासमोर आलं. यात लक्ष्मण मानेंची पुस्तके यातील एक मन्वंतर म्हणायला हवं. तसेच 'उद्ध्वस्त' मधून उपेक्षित आणि वंचित जगण्याचं चित्रण दिसतं. मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचं काम मानेंनी केलं आहे.

अरुण खोरे यांनी 'यशवंतराव चव्हाण : आठवणी आणि आख्यायिका' या पुस्तकाविषयी बोलताना यशवंतरावांबद्दल अनेक हृद्य आठवणी सांगितल्या. महाराष्ट्राच्या आणि देशाच्याही राजकारणासाठी हे पुस्तक ओनामा आहे, असंही ते म्हटले.

श्रीपाल सबनीस मनोगत व्यक्त करताना म्हटले, 'संस्कृतीला कवेत घेतल्याशिवाय संस्कृती अभ्यासणे शक्य नाही. ते लक्ष्मण माने यांना शक्य झाले आहे.' तसेच 'सत्यामुळे भारतीय संस्कृती प्रगल्भ होते आणि ती विश्वसंस्कृती पेलून धरते. कुठलीही एक जात, धर्म, माणूस फक्त महत्त्वाचा नसून सर्व मानवजात महत्त्वाची आहे.' असेही ते म्हणाले. पुस्तकांविषयी बोलताना 'सर्व प्रकारचे साहित्य लिहिले गेले पाहिजे. तसेच मराठी साहित्यातील एक नवी परंपरा 'उपरा'मुळे सुरू झाली.' असे मत त्यांनी व्यक्त केले. अक्षय वाटवे यांनी आभार मानले.

कार्यक्रमाच्या शेवटी लक्ष्मण मानेंच्या स्वाक्षरीनिशी ही तीनही पुस्तके घेण्याची सुवर्णसंधी वाचकांना मिळाली.

'राफिणू' विज्ञान कादंबरीचं उत्साहात स्वागत...

मेहता पब्लिशिंग हाऊस तर्फे डॉ. संजय ढोले यांच्या 'राफिणू' या विज्ञान कादंबरीचं १ जुलै, २०२३ रोजी प्रकाशन करण्यात आलं. डॉ. संजय ढोले, 'किशोर'चे संपादक किरण केंद्रे, फर्ग्युसन महाविद्यालयातील मराठीचे प्राध्यापक डॉ. आनंद काटीकर आणि छात्र प्रबोधिनीचे संपादक महेंद्र सेठिया यांच्या उपस्थितीत गरवारे कॉलेज ऑफ कॉमर्सच्या स्वा. सावरकर सभागृहात हा प्रकाशन सोहळा पार पडला. तन्मयी विद्यासागर, विशाखा मठे, तनिष्का ढोले आणि रूही या लहानग्या वाचक मुलींच्या हस्ते अभिनव पद्धतीने पुस्तकाचे प्रकाशन झाले. तन्मयी विद्यासागर हिने यावेळी 'राफिणू' विषयी आपले मत व्यक्त केले.

डॉ. ढोले यांनी राफिणूच्या उत्पत्तीबद्दल, तसेच कादंबरीचे बीज कसे पडले व कादंबरी आकाराला कशी आली यासंदर्भात सविस्तर विवेचन केले. आजच्या पिढीसाठी वैज्ञानिक कथांची गरज का आहे याबद्दलही ते बोलले. बालसाहित्य हे प्रौढांसाठीच्या साहित्यापेक्षा पेलण्यास कठीण असते. येत्या काही काळात राजू फिरके हा नायक घेऊन ते वाचकांच्या भेटीला येणार असल्याचे सूतोवाच त्यांनी केले.

'आपल्याकडे विज्ञान साहित्याकडे दुर्लक्ष झालेले आहे. या पार्श्वभूमीवर ही कादंबरी येणं, खूप महत्त्वाची बाब आहे,' असे किरण केंद्रे यांनी आपल्या मनोगतात सांगितले. तसेच राजू फिरके हे पात्र वैश्विक मूल्य घेऊन जन्माला आले आहे व मराठी बालसाहित्यात अशा पद्धतीच्या लेखनाचा प्रवाह निर्माण व्हायला हवा, असेही प्रतिपादन त्यांनी केले.

'फास्टर फेणे,' 'चिंगी'नंतर राजू फिरके हे पात्र पुढे येते आहे, याविषयी प्रचंड उत्सुकता असल्याचे आनंद काटीकर म्हणाले. बालवयात उत्सुकता असलीच पाहिजे. त्यामुळेच मुलांच्या कल्पनाशक्तीचा विकास होतो. विज्ञानकथांच्या शहरी भिंती तोडून ग्रामीण भागात विज्ञानकथा पोचवण्याचं काम डॉ. ढोले

यांनी केलं, असेही ते यावेळी म्हणाले.



महेंद्र सेठिया आपल्या मनोगतात म्हणाले की, डॉ. ढोले यांच्या लिखाणात सहजता आहे. त्यामुळे त्यांच्या कथा वाचायला आवडतात. तसेच विज्ञान आपण तुकड्यातुकड्याने पाहू शकत नाही. ते एकात्म असते. कथांचेही तसेच असते. कदाचित दहा वर्षांनी त्यावेळच्या मुलांना कोरोनाबद्दल काही माहिती नसेल; पण या कादंबरीमुळे त्यांना संदर्भासहित ते सर्व समजेल, असेही ते यावेळी म्हणाले.

मेहता पब्लिशिंग हाऊसचे साहिल मेहता व रूपा मेहताही यावेळी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक रूपा मेहता यांनी व सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन प्रतीक येतावडेकर यांनी केले. संध्या विद्यासागर यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमाच्या शेवटी लेखकाच्या स्वाक्षरीनिशी हे पुस्तक घेण्याची संधीही वाचकांना यावेळी मिळाली.

'आता मव्हं काय!' या आत्मकथनाचे थाटात प्रकाशन

'आत्मकथन हे व्यक्ती आहे, समाज आहे, मनातली धग आहे. परिस्थितीला धक्का देणारे, समाजाच्या उलट प्रवाही जगणारे अश्रूंच्या माळा करीत नाहीत. अश्रू पेटवून लावतात आणि प्रवाहाबरोबर जे चालतात ते वर्तमान व इतिहास निर्माण करू शकत नाहीत. जे हिंमत करतात ते स्वतःच्या प्रवासासाठी स्वत:ची नवी वाट तयार करतात. नवे आयाम प्रस्थापित करतात. देविदास तारु यांचे 'आता मव्हं काय!' हे आत्मकथन तरुणांना नवी वाट आणि स्फूर्ती देणारे आहे,' असे प्रतिपादन अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे पूर्वाध्यक्ष ज्येष्ठ लेखक-संपादक उत्तम कांबळे यांनी केले.

नांदेड येथील प्रयोगशील शिक्षक डॉ. देविदास तारु यांच्या 'आता मव्ह काय' या आत्मकथनाचे प्रकाशन उत्तम कांबळे यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राज्याचे माजी शिक्षण संचालक गोविंद नांदेडे हे होते. मंचावर राजश्री हेमंत पाटील, बालभारती, 'किशोर'चे संपादक किरण केंद्रे, ज्येष्ठ लेखक देविदास फुलारी, मनोज बोरगावकर, संपादक शंतनू डोईफोडे, संतोष पांडागळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना उत्तम कांबळे पुढे म्हणाले की, 'देविदास तारु यांच्या पुस्तकात दु:खाचे सार्वत्रिकरण झाले. सगळीकडे आपण स्वत: दिसतो तेव्हा ते लेखन सर्वव्यापी होते. शिक्षण आणि ज्ञान यात मूलभूत फरक आहे. शिक्षण हे तांत्रिक असतं. शिक्षणाच्या परिघाबाहेर लढण्याचे आयुध घ्या, हिंमत करून उन्हात उभे राहा आणि स्वत:ची सावली स्वत: निर्माण करा.'

'आत्मकथनातील प्रत्येक भाग एक नवीन पुस्तक होऊ शकते. पाणी प्रवाही राहिले तर त्याची नदी होते. असा सुंदर प्रवाह या आत्मकथनात आढळतो, असे मत सौ. राजश्रीताई पाटील यांनी व्यक्त केले. 'आता म्हव काय' हे आत्मचरित्र म्हणजे मराठी आत्मकथनातील वंचित, पीडितांची कहाणी सांगणारे दर्जेदार आत्मकथन असल्याचे ज्येष्ठ लेखक मनोज बोरगावकर यांनी सांगितले. किरण केंद्रे यांनी 'ज्ञान, निर्भयता, संघर्ष, लढता लढता लिहिले ते मनाला भिडते असे हे प्रांजळ स्वकथन आहे,' असे सांगितले. यावेळी त्यांनी त्यांच्या आयुष्यातील अनेक बिकट प्रसंग विशद केले. शंतनू डोईफोडे, संतोष पांडागळे यांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त करून लेखकाला शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. राम वाघमारे यांनी, सूत्रसंचालन डॉ. विलास ढवळे यांनी, तर आभारप्रदर्शन मिलिंद व्यवहारे यांनी केले.

◆

नवी संहिता... नवा आशय...

ब्लॉटिंग पेपर

स्वाती चांदोरकर

चिंतन आणि भावनांची साधलीय छानशी लय...
जीवनाचे विविध रंग शोषते 'ब्लॉटिंग पेपर'

किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

अस्तित्वाचा उत्सव



गुणवंत शाह

अनुवाद

मृणालिनी देसाई

'ईशावास्यम' उपनिषदाचं रसाळ निरूपण मांडणारं आणि जीवनाची लय स्पष्ट करणारं अद्‌भुत मार्गदर्शक पुस्तक

किंमत : ६९०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

विशेष लेख

आंतरराष्ट्रीय कीर्तीचा सहृदय साहित्यिक
मनोहर माळगांवकर

इंग्रजी साहित्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक भारतीय लेखक/कादंबरीकार नावारूपाला आले. या सर्वांमध्ये सर्वांत आद्य नाव म्हणजे कर्नल मनोहर माळगांवकर. माझ्या वडिलांनी म्हणजे कै. भा. द. खेर यांनी 'दि प्रिन्सेस', 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' (अधांतरी), 'डेव्हिल्स विंड' (वादळवारा) आणि 'गार्लन्ड कीपर्स' (दोन कावळे) या माळगावकरांच्या चार इंग्रजी कादंबऱ्यांचा मराठीत अनुवाद केला होता. या सर्वच कादंबऱ्या मराठीत प्रचंड गाजल्या. परंतु 'दि प्रिन्सेस' ही कादंबरी विशेष गाजली. या कादंबरीच्या १९६५ साली मराठीत पंधरा हजार प्रती संपल्या होत्या! त्यानंतरही अनेक आवृत्त्या प्रकाशित झाल्या. मराठी अनुवाद खपण्याचं ते एक मोठं रेकॉर्डच म्हणावं लागेल! विशेष म्हणजे, माळगावकरांनी तेव्हा या कादंबऱ्यांपोटी नाममात्र एक रुपया रॉयल्टी घेतली होती! या महान कादंबरीकाराचं मोठेपण तिथे दिसून आलं होतं. जरी इंग्रजीत त्यांना अफाट रॉयल्टी मिळाली होती, तरी येणारं मोठं मानधन असं कुणी थोडंच सोडत असतो?

माझे वडील सांगत, 'दि प्रिन्सेस' १९६४ सालच्या दरम्यान इंग्लंडमध्ये प्रकाशित झाली. इंग्लंडमधील 'हॅमिश हॅमिल्टन' या जगन्मान्य प्रकाशन संस्थेनं ती प्रकाशित केली. त्यानंतर जगभर 'दि प्रिन्सेस'च्या अनेक आवृत्त्या प्रकाशित होत गेल्या. त्यापोटी माळगावकरांना भारतीय चलनात ८५ लाख रुपये रॉयल्टी पहिल्या काही दिवसांतच मिळाली होती! पुढे 'वॉर्नर ब्रदर्स' या हॉलीवूडच्या चित्रपट निर्मात्यांनी या कादंबरीचे हक्कही विकत घेतले होते. तो चित्रपट आला की नाही, हे मला माहीत नाही. 'द मेन हू किल्ड गांधी' पर्यंत माळगावकरांच्या सर्वच कादंबऱ्या आणि पुस्तकं विशेष गाजली. अनेक जागतिक भाषांमध्ये त्यांच्या पुस्तकांचे अनुवाद झाले; पण

त्यांच्या 'दि प्रिन्सेस' इतकी लोकप्रियता इतर कादंबऱ्यांना मात्र मिळाली नाही. माझे वडील सांगत, 'माळगावकरांनी 'दि प्रिन्सेस' उत्तमच लिहिली आहे; परंतु त्यांची 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' ही कादंबरी मला अधिक बांधेसूद वाटते.'

तथापि, 'दि प्रिन्सेस' जगभर गाजल्यानंतर असंख्य लहान-मोठ्या मराठी लेखकांनी माळगांवकरांना पत्र पाठवून अनुवाद करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती; पण ती संधी माझ्या वडिलांना मिळाली. त्यासाठी ना. सी. फडके यांनी माळगांवकरांकडे माझ्या वडिलांच्या नावाची शिफारस केली होती. फडक्यांनी माळगावकरांना लिहिलं होतं, '...कादंबरी-लेखनासाठी जे भाषेचं सौंदर्य लागतं ते खेरांच्या लेखणीत आहे. ते चांगले कसलेले कादंबरीकार आहेत. त्यामुळे तेच या कादंबरीला न्याय देऊ शकतील!'

-आणि माझ्या वडिलांनी ती गोष्ट खरी करून दाखवली. 'दि प्रिन्सेस'चा कुठेही अनुवाद वाटत नाही; उलट ती मूळ मराठी कादंबरी वाटते. अनेक समीक्षकांनी आणि वाचकांनी या कादंबरीच्या मराठी अनुवादाविषयी गौरवोद्गार काढले होते. मराठी अनुवाद वाचून स्वत: माळगांवकरांनी माझ्या वडिलांना एक पत्र पाठवलं होतं. त्यात म्हटलं होतं, 'तुम्ही केलेला अनुवाद इतका सुंदर आहे की, जणू ही कादंबरी तुम्ही मराठीत प्रथम लिहिली असून मी त्याचा इंग्रजी अनुवाद केला आहे, इतकं तुमचं लेखन सुंदर आहे!' ('As you have written this novel in Marathi and I have translated it in English!') मग नि:शंक होऊन माळगांवकरांनी त्यांच्या पुढच्या तीन कादंबऱ्या माझ्या वडिलांना अनुवाद करण्यासाठी दिल्या. यथावकाश 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' (अधांतरी), 'डेव्हिल्स विंड' (वादळवारा) आणि 'गार्लन्ड कीपर्स' या कादंबऱ्या माझ्या वडिलांनी मराठीत आणल्या. 'दि प्रिन्सेस' आणि 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' या कादंबऱ्या त्यावेळी 'केसरी' प्रकाशनाने तर उरलेल्या दोन्ही कादंबऱ्या 'किर्लोस्कर प्रेस'ने प्रकाशित केल्या होत्या. 'दि प्रिन्सेस' आणि 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' या दोन्ही कादंबऱ्या 'सह्याद्री' मधूनही क्रमश: प्रकाशित झाल्या होत्या. त्यानंतर त्या पुस्तक-स्वरूपात प्रकाशित झाल्या. माझे वडील तेव्हा 'केसरी'चे सहसंपादक होते तर 'सह्याद्री'चे संपादक होते. दोन्ही माध्यमांतून 'दि प्रिन्सेस' आणि 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' गाजल्यामुळे स्वाभाविकच माळगांवकरांना पुण्यात निमंत्रित करून त्यांचा यथोचित सत्कार करावा, असं जयंतराव टिळक प्रभृतींच्या मनात आलं. त्यानुसार माळगांवकरांना निमंत्रणाचं पत्र पाठवलं गेलं आणि त्याला प्रतिसाद देत माळगांवकरांनी

पुण्याला येण्याचं मान्य केलं. दुपारी चार वाजता निवडक मान्यवरांसमवेत 'केसरी'च्या ग्रंथालयात तो छोटेखानी कार्यक्रम संपन्न झाला. मेजर जनरल परांजपे, कर्नल जाधव, काकासाहेब गाडगीळ, ना. सी. फडके, ग. दि. माडगूळकर अशी अनेक निमंत्रित मान्यवर मंडळी होती. अल्पोपहार-चहापानानंतर ना. सी. फडके यांनी माळगांवकरांना मुद्दाम इंग्रजीत भाषण करायला सांगितलं. त्यांच्या भाषणातला साधेपणा सर्वांना भावला. कुठेही मोठेपणाचा आव नव्हता किंवा आढ्यता नव्हती.

'दि प्रिन्सेस' आणि 'कॉम्बॅट ऑफ शॅडोज्' संदर्भात या साऱ्या घटना घडत असताना मी मात्र त्याविषयी अनभिज्ञ होतो; कारण मी तेव्हा जेमतेम चार वर्षांचा होतो! परंतु; मला पुढे या साऱ्या घटना समजल्या. तेव्हा फक्त 'प्रिन्सेस', 'अधांतरी' अशी नावं माझ्या कानांवर तेव्हा पडत. माझ्या वडिलांची उत्साही धावपळही मला समजत असे; परंतु जगद्विख्यात कादंबरीकार मनोहर माळगांवकर वगैरे गोष्टी माझ्या समजेच्या बाहेर होत्या. त्यांच्याविषयी आकर्षण वाटण्याचं माझं वयही नव्हतं; पण पुढे पुष्कळ वर्षांनी माळगांवकरांना पाहण्याचा योग आला.

'द मेन हू किल्ड गांधी' या कादंबरीसाठी संदर्भ गोळा करण्याकरता माळगांवकर एकदा पुण्याला आले होते, तेव्हा त्यांना दुरून पाहिल्याचं मला आठवतं. त्यानंतर पु. ल. देशपांडे यांनी अनुवाद केलेल्या 'कान्होजी आंग्रे' या कादंबरीच्या प्रकाशनासाठी माळगांवकर पुन्हा पुण्यात आले होते. तेव्हा 'बालगंधर्व' मध्ये मी त्यांचं प्रत्यक्ष भाषण ऐकलं होतं. पु. लं.चं भाषण ऐकणं म्हणजे पर्वणीच असायची; त्या पार्श्वभूमीवर माळगावकरांचं भाषण तसं साधंसुधं-अगदी सहज होतं. आंतरराष्ट्रीय स्तरावर गाजलेल्या इतक्या मोठ्या लेखकाचं ते साधेपण मला अतिशय भावलं होतं. इतकंच नाही तर; त्यांच्या आणखी दोन विचारांचा माझ्या मनावर कायमचा परिणाम झाला होता.

एकदा गप्पा मारताना माळगांवकर माझ्या वडिलांना म्हणाले होते, 'लेखकानं त्याच्या कलाकृती वाचकांपुढे आणाव्यात; पण स्वत: मात्र प्रसिद्धीपासून दूर अंधारात राहावं!' ही त्यांची इंग्रजी लेखकाची मानसिकता होती; आणि मला ती तितकीच भावली होती. त्यांच्या या विचारानं माझ्या मनावर सखोल परिणाम केला होता. त्यांचंच अनुकरण करून मीसुद्धा गेली जवळपास तीस वर्षं प्रकाशझोतापासून दूर राहत केवळ साहित्य कलाकृती निर्माण करत आलो आहे. आज माझी सहा भाषांमध्ये पंधरा पुस्तकं प्रकाशित झाली आहेत.

अमेरिकेतल्या 'झुमाया प्रकाशन संस्थे'नं माझी 'गीतांबरी' (The Song of Salvation) इंग्रजीत प्रकाशित केली, तर Platinum Press, Celestial Press यांनी माझ्या कादंबऱ्या/पुस्तकं भारतात इंग्रजीतून प्रकाशित केली. 'मेहता पब्लिशिंग हाऊस'नं ही काही पुस्तकं प्रकाशित केली आहेत; अजून काही करीत आहेत. 'मनोरमा प्रकाशन', केरळ यांनी मल्याळम् भाषेत माझं पुस्तक प्रकाशित केलं आहे तर तमिळनाडूतील मोठी प्रकाशन संस्था माझं पुस्तकं तमिळमध्ये प्रकाशित करीत आहे. 'देह झाला चंदनाचा', 'धनंजय', 'उदयन' अशा माझ्या अनेक 'बेस्ट-सेलर' कादंबऱ्या/पुस्तकं आज वाचकमान्य असून त्यांच्या आवृत्त्या सातत्यानं प्रकाशित होत असतात. परंतु; हे यश सन्मानानं मिरवत राहण्यापेक्षा लेखकानं थोडं प्रसिद्धीपासून दूर अंधारातच राहावं, हा माळगावकरांचा कानमंत्र मी यथाशक्य पाळत आलो आहे!

'दि प्रिन्सेस'च्या अभूतपूर्व यशानंतर माळगांवकरांनी कर्नाटकातल्या 'जगलबेट' इथे शंभर एकर जंगल खरेदी केलं. जंगलातल्या आदिवासींना किंवा मूळ निवासींना त्यांनी तिथेच ठेवून घेतलं; आपल्या परिवारात सामावून घेतलं. जंगलामध्ये त्यांनी स्वत:साठी एक घर बांधलं. पत्नी मनोरमा आणि भाऊ विभाकर यांच्यासमवेत ते तिथेच वास्तव्य करीत. बाजूला कुडाची एक छोटी खोली त्यांनी बांधली होती. तिथेच बसून ते लेखन करीत. यावरून सॉमरसेट मॉमची आठवण होते. तोही एका बाजूला असलेल्या अगदी छोट्या खोलीत लेखन करीत बसत असे. आपल्या घरी येणाऱ्या पाहुण्यांचं माळगांवकर पतिपत्नी अतिशय प्रेमानं स्वागत करीत; आदरातिथ्य करीत.

माळगांवकरांच्या दुसऱ्या अशाच विचारानं माझ्या मनावर परिणाम केला आहे. तो म्हणजे, ते एकदा माझ्या वडिलांना म्हणाले होते, 'रोज रात्री मी झोपताना विचार करतो, आज मी 'प्रोडक्टिव्ह' काय केलं? जर मी काही काम केलं नसेल/लिहिलं नसेल तर माझ्या मनाला खंत लागून रहाते. मग दुसऱ्या दिवशी मी अधिक जोमानं कामाला बसतो.'

आजही रात्री झोपण्यापूर्वी मी असाच विचार करतो. लेखनासाठी त्याचा मला नक्कीच फायदा होतो. माळगांवकरांनी मला अप्रत्यक्षपणे दिलेले हे कानमंत्र मी कधीही विसरलो नाही किंवा ते कधीही मनाआड झाले नाहीत.

आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या या साहित्यिकाला माझी आदरपूर्वक भाववंदना.

– राजेन्द्र खेर

◆

पुस्तकाच्या पानांतून



इश्क@मांडवी

मिलिंद महांगडे

मांडवीच्या तरल प्रवाहाकाठी फुललेली अलवार भावस्पर्शी प्रेमकहाणी...

२०५२, मडगाव - मुंबई जनशताब्दी एक्स्प्रेस थोड्याच वेळात प्लॅटफॉर्म नंबर दोनवर येत आहे... २०५२, मडगाव - मुंबई जनशताब्दी एक्स्प्रेस थोडेही समय में प्लॅटफॉर्म नंबर दो पर आ रही है।...' गाडीची अनाउन्समेन्ट होत होती. अनाउन्समेन्ट झाल्या झाल्या प्लॅटफॉर्मवरच्या लोकांची लगबग सुरू झाली. आपापलं सामान घेऊन जो तो गाडी येण्याच्या दिशेने पाहू लागला. दोन मोठ्या सामानाच्या बॅगा घेऊन मी एका बाकड्यावर बसलो होतो. स्पीकरमधून येणारी रेल्वेची अनाउन्समेन्ट कानावर पडली तरी उठावंसं वाटत नव्हतं. मला कळत होतं की काही मिनिटांतच एक्स्प्रेस येणार होती आणि मी कायमचा इथून निघून जाणार होतो, परत कधीही न येण्यासाठी. माझे पाय साखळदंड बांधल्यासारखे जड झाले

होते. अंगातली शक्ती निघून गेल्यासारखी वाटत होती. नजर स्टेशनच्या गेटवर लागून राहिली. कदाचित ती परिचित आकृती दिसेल. कदाचित ती सारं काही विसरून मला भेटायला येईल, निदान शेवटचं तरी! जोरात वाजणाऱ्या गाडीच्या हॉर्नमुळे मी भानावर आलो. भगऽ -भगऽ भगऽ -भग... इंजिनाने धूर सोडला. त्या काळ्यामिट्ट धुरात स्टेशनचं ते गेटही आता दिसेनासं झालं. डब्यांमागून डबे पुढून सरकू लागले. गाडी थांबली तशी माणसं गाडीत चढण्याची घाई करू लागली. लहानशा दरवाज्यातून धडपडत आत जाणाऱ्या माणसांकडे मी विमनस्क नजरेने पाहत होतो. मलाही आता त्याच गाडीत जायचं होतं. गाडीत चढताना आपलं फार महत्त्वाचं असं काहीतरी आपण सोडून चाललोत, अशी एक बोचरी जाणीव होत होती. माझ्या सीटवर जाऊन बसलो, खिडकीतून बाहेर शून्य नजरेने बघत. जीवनरूपी पुस्तकातलं एक सुंदर प्रकरण संपलं होतं. त्याचा शेवट चांगला होऊ शकला असता; पण काही गोष्टी अशा घडत गेल्या की त्यांवर कुणाचंच नियंत्रण राहिलं नाही. असाहाय्यपणे पाहण्यावाचून माझ्या हातात काहीच उरलं नाही. पुन्हा एकदा हॉर्न वाजवून एक्स्प्रेस हळुवारपणे पुढे निघाली. स्टेशनचं गेट डोळ्यांसमोरून जात असलेलं मला दिसत होतं. अजूनही ती वेडी आशा मनाला लागून राहिली होती. छे! अगदीच निरर्थक! एक्स्प्रेस स्टेशनमधून बाहेर पडली आणि तिने वेग घेतला.

◆

पुस्तकाच्या पानांतून



राझ महाल

नील नेथन

अनुवाद

गौरी देशपांडे

ताजमहालाच्या सौंदर्याला नव्या रहस्याची किनार...
उत्कंठा आणि अद्‌भुताच्या अनुभूतीत गुंतवणारं
अफलातून कथानक

कागदांनी भरलेला एक फोल्डर घेऊन चोप्रा सर्वोच्च न्यायालयाच्या प्रवेशद्वारात उभे होते. त्यांनी आकाशाकडे पाहिलं. मान्सून जवळ येऊन ठेपल्याची चांगलीच चिन्हं दिसत होती. प्रवेशद्वारासमोर एक रिक्षा येऊन थांबली, त्यातून एक तरुणी उतरली, व तिनं चालकाला पैसे दिले. इकडेतिकडे बघत तिनं चोप्रांना शोधलं व ती त्यांच्याजवळ गेली.

''चोप्रा सर?''

चोप्रा हसले. ''नंदिनी?'' त्यांनी तिला अलगद मिठी मारली व एक निःश्वास सोडला. ''तुझ्यासाठी हे सगळं किती अवघड आहे, याची मला कल्पना आहे. तुझ्या वडिलांचा अजूनही काहीच पत्ता लागलेला नाही.'' काय बोलावं ते त्यांना सुचत नव्हतं. ''ते जिथे असतील तिथे सुरक्षित असावेत

अशी माझी प्रार्थना आहे... पण आपण जे ठरवलं आहे ते करायलाच हवं.''

नंदिनीनं मान हलवली. ''हो. मी माझ्या वडिलांना ओळखते. त्यांनीही आपल्याकडून हीच अपेक्षा केली असती.''

''चल, ज्येष्ठ वकील डॉक्टर मूर्ती आपल्याला पायऱ्यांजवळ भेटणार आहेत,'' चोप्रा म्हणाले.

काही पावलं चालून ते त्या न्यायपीठाच्या मुख्य इमारतीच्या दिशेनं गेले. काळा झगा परिधान केलेले वकील डॉ. मूर्ती जिन्याच्या वरच्या पायरीवर त्यांची वाट बघत थांबले होते. आत्मविश्वासपूर्ण, दिलासादायक हास्य करीत त्यांनी त्यांचं स्वागत केलं.

''इतकं धाडसी पाऊल उचलल्याबद्दल तुम्हा दोघांचेही आभार.'' ते नंदिनीकडे वळले. ''तुमच्या वडिलांनी देशासाठी मोठंच कार्य केलंय. डॉ. रॉयचा अहवाल व विजयकुमारचं आरटीआय उत्तराचं विश्लेषण, या दोन उत्कृष्ट दस्तऐवजांमुळे,'' हातातल्या कागदांकडे पाहत डॉ. मूर्ती म्हणाले, ''ताजमहालाचं पूर्णतः शास्त्रीय संशोधन करण्याचा आदेश देण्याचा विचार माननीय न्यायालय करेल, याची मला खात्री आहे.'' चोप्रा व नंदिनीनं होकारार्थी मान हलवली.

ते वळत असतानाच त्यांना प्रा. माथुर, डॉ. नायक व मलिक जिन्यावरून येताना दिसले. दोन्ही गट समोरासमोर आले व एकमेकांकडे पाहून औपचारिक हसले.

''अधीक्षक चोप्रा?'' प्रा. माथुर म्हणाल्या.

''नाही, मॅडम,'' चोप्रा म्हणाले. ''एक नागरिक चोप्रा. मी नोकरीचा राजीनामा दिला आहे.''

मागे वळून, ते सर्व कोर्टरूमच्या दिशेनं गेले.

खचाखच भरलेल्या कोर्टरूममध्ये, न्यायालयीन कारवाईला सुरुवात होत होती. क्लार्कनं घोषणा केली, ''वकील डॉक्टर मूर्ती प्रतिनिधित्व करत असलेले नागरिक राकेश चोप्रा व नंदिनी कुमार विरुद्ध भारताचे केंद्रसरकार. याचिकाकर्त्यांनी ताजमहालाचं संपूर्ण शास्त्रीय संशोधन व सर्वेक्षण करण्याची मागणी भारताच्या केंद्रसरकारकडे केली आहे.''

''कारवाईला सुरुवात करा,'' न्यायमूर्तींनी आदेश दिला. ''याचिकाकर्ते त्यांचे आरंभिक विधान मांडू शकतात.''

वकील डॉ. मूर्तींनी बोलायला सुरुवात केली,''माननीय न्यायमूर्ती, 'ताजमहाल' जगातल्या महान वास्तूंपैकी एक आहे. हा भारताचा व अवघ्या जगाचा मौल्यवान ठेवा आहे. 'ताजमहाल' कोणी व का बांधला याच्या आख्यायिका व कथा सर्वश्रुत आहेत. तरीही, 'ताजमहाल' कोणी, केव्हा व कोणत्या हेतूनं बांधला, याचे सुस्पष्ट व विश्वासार्ह पुरावे उपलब्ध नसल्याचं अलीकडच्या एका आरटीआय याचिकेतून समोर आलं आहे. मुघल शासक खुर्रम शहाजहाननं 'ताज'च्या इमारतीवर काही काम केलं असावं, हे दर्शविणारा पुरावा आहे. शहाजहाननं राजा जयसिंगकडून भव्य इमारत मिळवली, असंही दस्तऐवज सूचित करतात.

''ताजमहालाचं गूढ उकलण्यासाठी, भारताच्या केंद्रसरकारला आणि 'ब्यूरो ऑफ आर्किऑलॉजी'सारख्या महत्त्वाच्या विभागाला पुढील आदेश द्यावेत, अशी आमची मागणी आहे: १) ताजमहालाचं संपूर्ण शास्त्रीय पुरातत्त्वीय सर्वेक्षण करावं, २) ताजमहालावर कार्बन डेटिंग किंवा थर्मो-ल्यूमिनेसन्स अशा वय निश्चित करणाऱ्या प्रक्रिया कराव्यात, ३) ताजमहालाचे सर्व मजले, विभाग व खोल्या इत्यादींची यादी करावी, नोंदी कराव्यात व त्यांचा सर्व तपशील प्रकाशित करावा, ४) ताजमहालाचे वरील सर्व भाग बघण्याची व त्यांचा अभ्यास करण्याची परवानगी संशोधकांना द्यावी, ५) काही शास्त्रीय कारणामुळे शक्य नसलेले भाग वगळता, ताजमहालाचे वरील सर्व भाग सर्वसामान्य जनतेसाठी खुले करावेत, ६) भारताबाहेरील पर्शिअन भाषातज्ज्ञांच्या सहभागासह जनतेच्या देखरेखीखाली बादशहानाम्याचं संपूर्ण भाषांतर करावं व ते प्रकाशित करावं, ७) संपूर्ण तपास व संशोधन करून ताजमहाल कोणी बांधला, केव्हा बांधला व कोणत्या हेतूनं बांधला याचा अचूक घटनाक्रम निश्चित करावा, आणि ८) वरील बाबी पूर्ण होईपर्यंत, सर्व अधिकृत दस्तऐवजांमध्ये ताजमहालाच्या सध्या प्रचलित असलेल्या कथेचा 'तपासाधीन आख्यायिका' असा उल्लेख करावा.''

कोर्टरूमच्या एका कोपऱ्यात, दर्शकांमध्ये एक पी कॅप घातलेला, बुटका माणूस बसला होता. त्याच्या लांब केसांनी व दाढीनं त्याचा चेहरा जवळजवळ झाकून टाकला होता. आपल्यासमोर सुरू असलेली तणावपूर्ण न्यायालयीन कारवाई तो उत्कंठेने पाहत होता. पण त्याच्या चेहऱ्यावर मात्र एक प्रकारचं समाधान झळकत होतं.

◆

आता मव्हं काय!

डॉ. देविदास तारु

दारिद्र्य, गुन्हेगारी आणि वंचनांच्या कात्रीत सापडलेला असतानाही शिक्षणाची वाट अंगीकारून जगण्याचा आदर्श उभा करणाऱ्या लेखकाचं हृदयस्पर्शी आत्मकथन

किंमत : ३००/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

ज्ञानाई सावित्रीबाई फुले



डॉ. सुवर्णा नाईक निंबाळकर

ज्ञानाई सावित्रीबाई फुले यांच्या काव्यजाणिवा आणि त्यांचं समग्र चिंतन यांवर प्रकाश टाकणारं दर्जेदार चरित्र

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



नथिंग व्हेंचर्ड

जेफ्री आर्चर

अनुवाद

सविता दामले

एका हरवलेल्या चित्राचा शोध घेता-घेता अनेक रहस्यांची गुंफण अलगद सोडवणाऱ्या डिटेक्टिव्ह विल्यम वॉरिकची अनोखी शोधकथा...

१४ जुलै, १९७९

''खरंच, छे! काहीतरीच काय?''

''एवढा गंभीर तर मी कधीच नव्हतो, डॅड. गेल्या दहा वर्षांपासून सांगतोय. जरासं लक्ष दिलं असतंत तरी कळलं असतं तुम्हाला...''

''अरे पण... माझ्याच ऑक्सफर्डच्या जुन्या कॉलेजात कायद्याचा अभ्यास करायला प्रवेश देताहेत ना तुला ते? पदवी मिळाली की, तू माझ्यासोबत वकिलीही करू शकशील. तरुण मुलाला याहून दुसरं काय हवं असणार?''

''दुसरं काय हवं असणार म्हणजे? बाबा, मला स्वतः निवडलेलं करिअर करायची परवानगी हवी आहे तुमच्याकडून. केवळ वडिलांच्या पावलावर

पाऊल टाकण्याची अपेक्षा माझ्याकडून करू नका.''

''पण वडिलांच्या पावलावर पाऊल टाकण्यात वाईट काय आहे? मीही एक चित्तथरारक आणि उत्तम करिअर केलं. त्यात मला बऱ्यापैकी यश मिळालं असंही म्हणता येईल...''

''बाबा, मध्यम बिध्यम नव्हे, चांगलं लखलखीत यश मिळालंय तुम्हाला तुमच्या करिअरमध्ये; पण आत्ता आपण तुमच्या नव्हे तर माझ्या करिअरबद्दल बोलतो आहोत. शिवाय मला मोठा फौजदारी वकील बनून अख्खं आयुष्यभर काही ठरावीक दुर्जनांची बाजू कोर्टात लढवण्यात रस वाटत नसेल हे का विचारात घेत नाही तुम्ही? बरं, ते दुर्जनही असे, ज्यांना मी कधीही माझ्या क्लबवर उजळ माथ्याने जेवायला नेऊ शकणार नाही.''

''पण याच 'दुर्जनांनी' तुझ्या शिक्षणासाठी पैसे पुरवले आहेत, हे कसं विसरतोस तू? आताच्या तुझ्या जीवनशैलीसाठीचे पैसे याच 'दुर्जनांनी' पुरवले आहेत.''

''मला कुणी ते विसरूही देत नाही बाबा, म्हणूनच त्या दुर्जनांना दीर्घ काळ तुरुंगात पाठवण्यात मला माझं जीवन व्यतीत करायचं आहे. तुमच्या निष्णात वकिलीमुळेच तर त्यांना मोकळं सुटून गुन्हेगारी जीवन चालूच ठेवण्याची मुभा मिळते, तशी ती मिळता कामा नये.''

सरतेशेवटी आपण आपल्या वडिलांना गप्प करण्यात यशस्वी झालो असं विल्यमला वाटलं खरं; पण त्याचा अंदाज चुकीचा होता.

''बेटा, आपण मध्यम मार्ग काढू शकू यावर?''

''नाही, बाबा. शक्य नाही.'' विल्यम ठामपणे उत्तरला. ''एखादा कमकुवत खटला लढवणाऱ्या बॅरिस्टरने 'शिक्षा तरी कमी व्हावी,' यासाठी दुबळा युक्तिवाद करावा तसं बोलताय आत्ता तुम्ही; पण कधी नव्हे तो तुमच्या प्रभावी वक्तृत्वाचा माझ्यावर काहीही परिणाम होणार नाही.''

''पण माझं बोलणं न ऐकताच ते धुडकावून का लावतो आहेस?'' बाबांनी प्रतिप्रश्न केला.

''मी तुमचं बोलणं ऐकणार नाही, कारण एकतर मी अपराधी नाही आणि केवळ तुम्हाला खूश करण्यासाठी म्हणून मला कुठल्या ज्यूरीसमोर स्वतःचं निर्दोषत्व सिद्धही करायचं नाही.''

''पण मला आनंद मिळावा म्हणून काहीतरी करण्याची इच्छा असेलच

ना तुझी?'' वाग्युद्धाच्या या गरमागरमीत आई टेबलाच्या दुसऱ्या बाजूला शांत बसलेली आहे, हे विल्यम इतका वेळ विसरूनच गेला होता. नवरा आणि मुलगा यांच्यातील खणाखणी ती लक्षपूर्वक पाहत होती. वडिलांशी वाग्युद्ध खेळण्याची विल्यमनं कसून तयारी केली होती; पण आईसमोर आपली डाळ शिजणार नाही, हे त्याला माहीत होतं. तो पुन्हा मूक झाला. त्याच्या गप्प बसण्याचा वडिलांनी लगेचच फायदा उचलला.

''माय लेडी, आपल्या मनात काय आहे?'' सर ज्युलियन म्हणाले. उच्च न्यायालयातील न्यायाधीशाशी बोलावं तसं ते बायकोशी बोलू लागले. बोलता बोलता त्यांनी आपल्या जाकिटाची टोकं ओढून नीट केली.

''विल्यमला हव्या त्या विद्यापीठात जाऊ द्यावं,'' मार्जरी म्हणाली. ''त्याला ज्या विषयांचा अभ्यास करायचाय तो करू द्यावा आणि पदवी मिळाल्यावर जे करिअर करायचं आहे ते करू द्यावं. त्याहून महत्त्वाचं म्हणजे तो तसं करील तेव्हा तुम्ही खिलाडूपणे ते मान्य करावं, आणि हा विषय पुन्हा कधीही काढू नये.''

''मंजूर,'' सर ज्युलियन म्हणाले, ''पण आपला विवेकपूर्ण निकाल मान्य करताना त्याचा शेवटचा भाग आचरणात आणणं अवघड ठरेल माझ्यासाठी.''

त्यावर आई आणि मुलगा जोरजोरात हसू लागले.

''माझं होणारं नुकसान कमी करण्यासाठी अर्ज देऊ शकतो का मी?'' सर ज्युलियनने निरागसपणे विचारलं.

''नाही,'' विल्यम म्हणाला, ''कारण मी फक्त आईच्याच अटी मान्य करू शकतो. अर्थात मेट्रोपोलिटन पोलीस दलात जायच्या माझ्या निर्णयाला तुम्ही या तीन वर्षांच्या काळात बिनशर्त पाठिंबा दिलात तरच ते शक्य आहे.''

सर ज्युलियन वॉरिक, क्यू सी (क्वीन्स कॉन्सल) टेबलाशी यजमानपदाच्या स्थानी विराजमान झाले होते, ते पत्नीसमोर किंचित झुकून म्हणाले, ''बाईसाहेबांच्या मर्जीनुसार सर्व होईल.''

✧

विल्यम वॉरिकला वयाच्या आठव्या वर्षापासूनच तपास अधिकारी बनण्याची इच्छा होती. त्याच वयात त्यानं हरवलेल्या 'मार्स बार'च्या चॉकलेट्सचं प्रकरण सोडवलं होतं. आपण फक्त चॉकलेट गुंडाळलेल्या कागदांचा मागोवा

घेतला, त्यासाठी भिंगातून वस्तू निरखण्याचीदेखील गरज नव्हती, असं त्यानं वसतिगृहाच्या हाउसमास्टरना सांगितलं होतं.

दोषी मुलाच्या अभ्यासिकेतील कचऱ्याच्या डब्यात चॉकलेट्सवर गुंडाळलेली चांदी सापडली होती आणि आपण पॉकेटमनीतले पैसे खर्च करून ती चॉकलेट्स घेतली हे गुन्हेगाराला सिद्ध करता आलं नव्हतं.

विल्यमच्या दृष्टीने सगळ्यात वाईट काय ठरलं तर तो दोषी मुलगा ॲड्रियन हिथ हा त्याचा जीवलग मित्र होता. त्याच्याशी आपली मैत्री जीवनभर टिकेल, असं विल्यमनं जणू गृहीतच धरलं होतं. सहामाहीच्या सुट्टीमध्ये घरी गेल्यावर त्यानं बाबांना ते प्रकरण सांगितलं तेव्हा ते म्हणाले, ''या अनुभवातून ॲड्रियन धडा घेईल अशी आपण आशा करू या, नाहीतर त्या मुलाचं काय होईल ते कुणालाच सांगता येणार नाही.''

बाकीचे विद्यार्थी विल्यमची टिंगल करायचे, कारण ते स्वतः डॉक्टर, वकील, शिक्षक किंवा अगदी अकाउंटंट बनण्याची स्वप्नं पाहत होते. त्यामुळे आपण मोठेपणी पोलिसात जाऊन 'तपास अधिकारी' होणार, असं त्यानं करिअरचं मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांना सांगितलं, तेव्हा त्यांना अजिबात आश्चर्य वाटलं नाही. नाहीतरी, पहिली सहामाही संपायच्या आतच शाळेतल्या बाकीच्या मुलांनी त्याला 'शेरलॉक' असं टोपणनाव ठेवलं होतंच की!

विल्यमचे वडील सर ज्युलियन वॉरिक बीटी (बॅरिस्टर) यांना वाटत होतं की, आपल्या मुलानं 'ऑक्सफर्ड ' ला जाऊन कायद्याचा अभ्यास करावा. त्यांनी स्वतःही तीस वर्षांपूर्वी तेच केलं होतं; पण त्यांनी पुष्कळ प्रयत्न करूनही, विल्यमनं 'शाळा संपल्यावर लगेचच पोलीस दलात भरती व्हायचं' हा निर्धार बदलला नव्हता. सरतेशेवटी हे दोघे हटवादी पुरुष त्याच्या आईने मान्यता दिलेल्या तोडग्याप्रत पोहोचले. त्या तोडग्यानुसार विल्यम लंडन विद्यापीठात जाऊन 'आर्ट हिस्ट्री'चा अभ्यास करणार होता. खरं तर वडील त्या विषयाला गांभीर्याने घेण्यास सुद्धा तयार नव्हते; पण जर तीन वर्षांनी देखील त्यांच्या मुलाला पोलीस दलात जायचंच असलं तर ते तो निर्णय खिलाडूपणे मान्य करणार होते. मात्र, ते खिलाडूपणा दाखवतील हे बापजन्मात घडणार नाही, हेही विल्यम जाणून होता.

लंडनच्या 'किंग्ज कॉलेज'च्या तीन वर्षांतील क्षणन्क्षण विल्यमच्या दृष्टीने खूप आनंदाचा होता. तिथं तो असंख्य वेळा प्रेमात पडला असेल.

म्हणजे सुरुवातीला रेमब्रँटने काढलेल्या 'हॅना' या चित्राच्या, नंतर टर्नरने काढलेल्या 'ज्युडी' या चित्राच्या आणि सरतेशेवटी हॉकनी या चित्रकाराने काढलेल्या 'रेचल'च्या तो प्रेमात पडला. वेगवेगळ्या चित्रकारांच्या आणि त्यांच्या कलाकृतींच्या प्रेमात पडून झाल्यावर अखेर कॅरॅवाजिओ या चित्रकाराच्या मात्र तो कायमचा प्रेमात पडला. हे त्याचं प्रेम प्रकरण आयुष्यभर चालणार होतं. खरंतर सर ज्युलियन त्याला म्हणाले की, प्रत्यक्षात हा महान इटालियन चित्रकार खुनी होता. त्याला फासावरच लटकवायला हवं होतं; पण ते कळल्यावर विल्यमने उलट युक्तिवाद केला होता की, 'मृत्युदंडाची शिक्षा रद्दच करावी, यासाठी हे सबळ कारण आहे.' मग काय? पुन्हा एकदा बाप-लेकात मतभेद झाले.

शाळा संपल्यावर उन्हाळ्याच्या सुट्टीत विल्यम पाठीवर सामान घेऊन रोम, पॅरिस, बर्लिन आणि सेंट पीटर्सबर्गपर्यंत यूरोपभर भटकला. तिथं या सर्व भूतकालीन चित्रकारांची चित्रं पाहण्यासाठी उभ्या राहिलेल्या रसिकांच्या रांगेत उभाही राहिला. सरतेशेवटी त्याला पदवी मिळाली तेव्हा प्राध्यापकांनी सुचवलं की, कॅरॅवाजिओच्या चरित्रातील काळ्या बाजूवर तू पीएच.डी.चं संशोधन कर! तेव्हा विल्यमने त्यांना सांगितलं की, आपल्याला काळ्या बाजूवर नक्कीच संशोधन करायचं आहे; पण हा अभ्यास सोळाव्या शतकातील गुन्हेगारांचा नाही, तर सध्याच्या म्हणजे विसाव्या शतकातल्या गुन्हेगारांचा करायचा आहे.

✧

रविवार ५ सप्टेंबर, १९८२ रोजी दुपारचे ३ वाजायला पाच मिनिटं कमी असताना विल्यमने उत्तर लंडनमधील 'हेन्डन पोलीस कॉलेजा'त हजेरी लावली. त्यानंतर ब्रिटनच्या राणीशी निष्ठा वाहण्याच्या क्षणापासून ते सोळा आठवड्यांनंतर उत्तीर्ण झाल्याच्या कवायतीमध्ये सामील व्हायच्या क्षणापर्यंत प्रत्येक क्षणाचा त्यानं आनंद घेतला.

तिथं गेल्यावर दुसऱ्या दिवशी त्याला नेव्ही ब्लू रंगाचा 'सर्ज' कापडाचा गणवेश, हेल्मेट आणि पोलिसी दंडुका देण्यात आला. त्यानंतर जेव्हा तो खिडकीजवळून गेला तेव्हा प्रत्येक वेळी काचेच्या तावदानात दिसणारं स्वतःचं प्रतिबिंब पाहण्याचा मोह टाळणं त्याला शक्य होत नव्हतं. त्यांच्या कमांडर सरांनी कवायतीच्या पहिल्याच दिवशी सर्वांना सावध केलं होतं की, पोलिसी

गणवेश घातल्यावर माणसाचं व्यक्तिमत्त्व बदलून जातं आणि ते नेहमीच चांगल्या दिशेनं बदलेल असं नसतं.

'हेन्डन'मधले धडे दुसऱ्याच दिवशी सुरू झाले; वर्ग आणि जिम अशा दोन ठिकाणी ते विभागण्यात आले होते. विल्यमने कायद्याची सगळी कलमं एवढ्या वेळा वाचली की,त्यातला शब्दन् शब्द त्याला तोंडपाठ झाला. फोरेन्सिक आणि गुन्ह्याच्या दृश्याच्या विश्लेषणात तर त्याला खूपच रस वाटू लागला; पण 'स्किड पॅड' मोटारींशी त्याची ओळख करून देण्यात आली, तेव्हा मात्र त्याला चटकन लक्षात आलं की, आपली मोटारचालनाची कौशल्यं अगदीच यथातथा आहेत.

वर्षानुवर्षे सकाळी न्याहारी करताना वडिलांशी वाग्युद्ध करण्याची सवय असल्याने अभिरूप न्यायालयात विल्यम अगदी सहजगत्या वावरू शकला. त्या न्यायालयात त्याला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभं करून शिक्षक अधिकाऱ्यांनी त्याची उलटतपासणी घेतली. स्व-संरक्षणाच्या वर्गातही तो स्वतःची बाजू चांगली लढवू शकला. आपल्याहून वजनदार व्यक्तीला कसं निःशस्त्र करायचं, त्याच्या हातात बेड्या घालून त्याला कशी अटक करायची, हे त्याला तिथे शिकवण्यात आलं. अटक करणं, झडती घेणं, एखाद्या ठिकाणी प्रवेश करणं याविषयी पोलीस हवालदाराचे अधिकार, वाजवी बळाचा वापर आणि सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे धोरणीपणाचं वर्तन हे सगळंही त्याला शिकवलं गेलं. नियमांच्या पुस्तकाला नेहमीच चिकटून बसायचं नाही, हेही अध्यापकांनी त्याला सांगितलं, ''कधीकधी व्यवहारज्ञानही वापरावं लागतं. सर्वसामान्य जनतेशी वागताना तुझ्या लक्षात येईल की, कॉमनसेन्स हा कॉमन नसतो.''

विद्यापीठातील दिवसांच्या तुलनेने इथल्या परीक्षा अगदी घड्याळाच्या काट्यासारख्या वक्तशीर होत होत्या. अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत कित्येक उमेदवार अर्ध्या वाटेवरच गळाले ते बघून त्याला मुळीच आश्चर्य वाटलं नाही.

उत्तीर्ण झाल्यानंतरची कवायत संपल्यावर दोन आठवड्यांची रजा होती; कधी एकदा तो काळ संपतोय असं विल्यमला झालं. सरतेशेवटी 'येत्या सोमवारी सकाळी ८ वाजता 'लॅम्बेथ' पोलीस ठाण्यात हजर राहा,' असं पत्र त्याला मिळालं. लंडनच्या त्या भागात तो यापूर्वी कधीच गेला नव्हता.

◆

पुस्तकाच्या पानांतून



TBC-32 Book No. 2

सेल

रॉबिन कुक

अनुवाद

डॉ. अजेय हर्डीकर

'आयडॉक' या ॲपची निर्मिती... त्यामुळे ओढवलेला सहा रुग्णांचा मृत्यू... याबाबत एका रेडिओलॉजिस्टने केलेल्या संघर्षाचं उत्कंठावर्धक चित्रण

बोल्डर मेमोरियल हॉस्पिटल
ऑरोरा, कोलोरॅडो
सोमवार, १४ जुलै २०१४, सकाळचे-११.३७

डॉ. पॉल कॅल्डवेल यांना त्यांच्या पत्रपेटीत एक गुबगुबीत लिफाफा मिळाला. इतर जंक मेलमध्ये हा लिफाफा उठून दिसत होता. कॅल्डवेल यांनी पत्रावर पाठवणाऱ्याचा पत्ता दिसतोय का ते पाहिलं; पण तो नव्हताच. तेवढ्यात त्यांचं लक्ष पोस्टाच्या शिक्क्याकडे गेलं. 'लॉस एंजलिस'चा शिक्का दिसत होता. बाकीची पत्रं कचऱ्यात भिरकावून डॉ. कॅल्डवेल हा लिफाफा घेऊन आत गेले.

ते हॉस्पिटलमध्ये इमर्जन्सी रूमचे डायरेक्टर

होते. तिथं जाता जाता त्यांनी तो लिफाफा फोडला. त्यात आणखी एक लिफाफा होता. त्यावर फक्त त्यांचं नाव मोठ्या अक्षरात लिहिलेलं होतं. यावरही परतीचा काहीच पत्ता नव्हता. त्यांनी परत मोठ्या लिफाफ्यात पाहिलं. त्यात एकच कागद होता. ती चिठ्ठी त्यांनी बाहेर काढली. कोणीतरी आपल्या तिरक्या, सुंदर अक्षरांत; पण घाईघाईनं काहीतरी लिहिलं होतं. डॉ. कॅल्डवेलना हे अक्षर चांगलंच परिचित होतं. ते जॉर्ज विल्सनचं होतं! जॉर्ज विल्सन या रेडिओलॉजीच्या रेसिडेंटशी त्यांची ओळख होती. दोघांच्या ओळखीच्या एका मित्राबद्दल चर्चा करता करता मागच्या वर्षात जॉर्ज आणि कॅल्डवेल यांच्यात बरीच पत्रापत्री आणि मेलवरून बोलणं झालं होतं.

जॉर्जकडून असं काहीतरी आलंय, हे पाहून डॉ. कॅल्डवेल गोंधळले होते. त्यांच्या कपाळावर त्यामुळे आठ्या पसरल्या होत्या. तिथंच उभं राहून त्यांनी ती चिठ्ठी वाचली.

"तुम्ही खुशालीत आहात, अशी आशा करतो. तुम्हाला हे विचित्र वाटेल, पण मला तुमची मदत हवी आहे. आणखी एक आठवड्याभरात माझ्याकडून काहीच संपर्क झाला नाही, तर माझ्या या नंबरवर फोन करायचा प्रयत्न करा – (९१७)८४४-३२८९. तुमच्याकडून माझा नंबर हरवला असेल तर म्हणून परत देतोय.जर मी फोनवर भेटलो नाही तर तो दुसरा सीलबंद लिफाफा उघडा. त्यात लिहिलेलं वाचून मग तुम्हाला जे योग्य वाटेल ते पाऊल उचला.माझ्याबद्दल सांगायचं तर,बहुधा मी 'हॉलीवूड हिल्स'मधल्या 'लॉरेल कॅन्यन बुलेव्हार्ड ' इथल्या एका अतिसुरक्षित 'मेंटल हेल्थ फॅसिलिटी'मध्ये असेन! आणि, कसं सांगू? तिथून माझी सुटका झाली तर मला अत्यानंदच होईल! पण हे एकट्यानं करायला जाऊ नका. बरोबर घोडदळ, म्हणजे मीडिया आणि पोलीस असू द्या. आणि जर मी तिथं नसेन तर कदाचित मी तोवर मेलेलो असेन. पण मी तिथंच असेन, अशी आशा करू या! ही अत्यंत स्फोटक स्टोरी आहे."

– जॉर्ज

ता.क. असं करण्यात तुमच्या नोकरीलाही धोका असू शकतो!

◆

पुस्तकाच्या पानांतून



द गर्लफ्रेंड

मिशेल फ्रॅन्सेस

अनुवाद

उज्ज्वला गोखले

ती आली, तिने पाहिले, पण ती जिंकणार; त्यापूर्वी त्याची आई तिच्या मनसुब्यांना सुरुंग लावते आणि मग सुरू होते कुरघोडींची एक चित्तथरारक कथा!

तिचा मुलगा म्हणजे तिचा जीव की प्राण होता; तिच्या काळजाचा तुकडा आणि केवळ एवढंच महत्त्वाचं होतं. ती जे अघोरी कृत्य करायला निघाली होती ते तिच्यासमोर तशी संधी चालून आली होती म्हणून, बाकी त्याला काहीही अर्थ नव्हता. गेल्या काही महिन्यांतील जीवघेण्या परिस्थितीनंतर आशेचा किरण लुकलुकला होता आणि लॉराला जाणवलं होतं की, काहीही झालं तरी आपण ही संधी दवडता कामा नये. या गोष्टीवर विचार करण्यात तिने तासन्तास आपलं डोकं शिणवलं होतं; पण आता निर्णय घेतला गेला होता. आपण काय सांगणार आहोत, या विचारांनी क्षणभर तिचा थरकाप झाला. मुखावाटे उमटणाऱ्या शब्दांनी तिच्या काळजाच्या ठिकऱ्या होणार होत्या. यापूर्वी किंवा

यानंतर पुन्हा असं काही बोलण्याचा प्रश्नच येत नव्हता. मनातल्या मनात तिने पुन्हा एकदा उजळणी करायचा प्रयत्न केला; पण ते भयंकर शब्द तिच्या डोक्यात उमटूच शकले नाहीत. आकार घेण्यापूर्वीच तिच्या अंत:प्रेरणेने त्यांचा साफ धुव्वा उडवला होता.

हॉस्पिटलमधल्या त्याच्या स्वतंत्र खोलीतल्या बाथरूममध्ये गेल्या गेल्या तिची नजर बेसिनवरच्या आरशातल्या आपल्या प्रतिबिंबाकडे गेली. तिच्या डोळ्यांत ना राक्षसी भाव होते, ना एखादी विकृत चमक! तिच्या थकल्या भागल्या नजरेने तिची विवेकबुद्धी अजूनही जागृत असल्याची ग्वाही दिली आणि तिला जरा हायसं वाटलं. मात्र, तिला कमालीचा शीण आला होता. गेल्या काही दिवसांत ती एकदम म्हातारी दिसायला लागली होती. ते बघून ती जरा हबकली. तिच्या डोळ्यांभोवतीच्या आणि जिवणीभोवतीच्या सुरकुत्यांचं जाळं खूप वाढलं होतं. अतीव दु:खाची छाया आणि निराशेची टांगती तलवार या ताणांनी आपला ताबा घेऊ नये, म्हणून तर तिने हे नवीन महागडं हॉस्पिटल आणि निष्णात डॉक्टर्सची फौज, अशी चोख व्यवस्था केली होती. कुठून तरी आशेचा अंधूकसा किरण दृष्टीस पडेल, याच विचारांनी ती कसंबसं भान राखून होती. आपण काय करायला निघालोय, हे ती काही काळ विसरली आणि लवकरच काय घडणार आहे, याचा विचार करू लागली. नुसत्या त्या विचारांनीच तिच्या मनात आक्रंदन सुरू झालं आणि त्या यातनांनी परिसीमा गाठली. आधारासाठी तिने बेसिनचा काठ घट्ट धरला. काही क्षण असेच गेले. ती ताठ उभी राहिली. वर्तमानात कसलाच फरक पडलेला नव्हता.

चेरी आज परत आली होती. लॉराने बघितलं होतं. मेक्सिकोहून येणारी बहुतांश विमानं भल्या पहाटे 'हीथ्रो'ला पोहोचत होती. तिने घड्याळात पाहिलं. कदाचित एव्हाना ती तिच्या टूटिंगमधल्या घरी पोहोचलीसुद्धा असेल.

फोन हातात घेता घेता तिच्या घशात आवंढा आला; पण तिने निर्धाराने घसा खाकरला. इथे चुकीला थारा नव्हता. तिच्या जागी असणाऱ्या कोणत्याही माउलीने आता ती जे करणार होती, अगदी तसंच केलं असतं. आता आयत्या वेळी आपलं अवसान गळू नये म्हणून मनातल्या मनात तिने या मंत्राचा अक्षरशः जप केला.

तिने अतिशय काळजीपूर्वक नंबर फिरवला. यमयातनांनी तिला दरदरून घाम फुटला होता. तिचं अंग चिंब भिजलं होतं आणि मध्येच तिच्या शरीरावर

थंडीचा काटाही फुलत होता. लवकरच तिच्या आयुष्याची अखेर होणार होती. ज्या जीवनाला थोडातरी अर्थ होता त्याची आता सांगता होत होती. आपल्या थरथरणाऱ्या हातातून फोन निसटू नये म्हणून तिने दोन्ही हातांनी तो घट्ट पकडला होता आणि कानात प्राण आणून ती फोनची रिंग थांबण्याची प्रतीक्षा करत होती.

◆

नवी संहिता... नवा आशय...

राधिकासांत्वनम्



मुद्दुपलनी

अनुवाद

डॉ. शंतनू अभ्यंकर

प्रस्तावना

मुकुंद कुळे

भावोत्कट आणि कामोत्कट तेलुगु शृंगारकाव्याचा
रसाळ मराठी भावानुवाद

किंमत : ३३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

नवी संहिता... नवा आशय...

झंगाट

महादेव मोरे



श्रीपती आणि रुक्कीचं जुळलं सूत छान...
या प्रकारानं उठलं रान...
'झंगाटा'नं या मग गाजवलं गाव

किंमत : २३०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

तिंगाड

महादेव मोरे

सामाजिक, राजकीय, मानसिक विसंगती...
विनोदाच्या शिडकाव्याने उडतात हास्याची
कारंजी

किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



भटक्याचं भारुड

लक्ष्मण माने

भटक्या विमुक्तांच्या शोषणावर, वर्णव्यवस्थेवर, सरकारच्या अनास्थेवर परखड भाष्य करणाऱ्या भाषणांचा संग्रह

आश्रमशाळा

अध्यक्ष महाराज, मी आपल्या अनुमतीने पुढील प्रस्ताव मांडतो.

''राज्यात विमुक्त जाती व भटक्या जमाती यांच्यासाठी स्वेच्छा संस्थांमार्फत आश्रमशाळा उघडताना व चालवताना शासनाकडून दिल्या जाणाऱ्या अपुऱ्या अनुदानामुळे येणाऱ्या अडचणींचा;उदाहरणार्थ,अपुऱ्या इमारती, ग्रंथालयासाठी तरतूद नसणे, गाई-बैल यांच्या खरेदीसाठी तरतूद न करणं; खेळ-फर्निचर-आवश्यक भांडी-अंथरूण-पांघरूण-शौचालय-स्वच्छतागृह इत्यादी अत्यावश्यक बाबी नसणं; वसतिगृहासाठी पूर्णवेळ अधीक्षक न देणं इत्यादी अडचणींचा विचार करता या अनुदानात वाढ होण्याची

त्यांच्याकडून होत असलेली मागणी, याबाबत शासनाचं होत असलेलं दुर्लक्ष, परिणामी, संस्था-संचालकांत, कर्मचाऱ्यांत तसंच, विद्यार्थ्यांत पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने उपाययोजना करावी.''

आपला देश १९४७ साली स्वतंत्र झाला. तरीदेखील १९५१ सालापर्यंत विमुक्त जाती व भटक्या जमातींसाठी गुन्हेगारी जमातींचा कायदा लावण्यात आला. त्यानंतर विमुक्त जाती व भटक्या जमातींची यादी तयार करण्यात आली. विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या शिक्षणाच्या संदर्भात राज्य सरकारने या जमातींकरता वेगळ्या शिक्षणाची व्यवस्था करावी, अशा प्रकारचा निर्णय घेतला. त्यानंतर १९५३ सालानंतर आश्रमशाळा स्थापन करण्यास सुरुवात झाली. महाराष्ट्रातली पहिली आश्रमशाळा १९५३ साली सोलापूर येथे 'लांबोडी' या गावी भीमराव जाधव यांनी सुरू केली. त्यानंतर या सभागृहाचे सदस्य किसनराव राठोड यांनी मुखेड तालुक्यामध्ये दुसरी आश्रमशाळा सुरू केली. अशा प्रकारे महाराष्ट्र राज्यामध्ये विमुक्त जाती व भटक्या जमातींच्या मुलांना शिक्षण देण्यास सुरुवात झाली. या आश्रमशाळांना शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानाच्या संदर्भात १९५३ साली त्यावेळच्या सरकारने एक जी.आर. काढला होता. त्यावेळी ज्या रकमा या जी.आर.मध्ये सांगितल्या होत्या त्या त्यावेळी मोठ्या वाटत असतील; परंतु महागाई लक्षात घेता या रकमा फार कमी आहेत, असं आपल्याला दिसून येईल. १९५३ साली शासनाने ठरवलेला अनुदानाचा पॅटर्न आजदेखील चालू आहे. त्यामध्ये काहीही बदल करण्यात आलेला नाही.

या आश्रमशाळांवर १९७८ साली रात्री १२ वाजता अधिकाऱ्यांकडून धाडी घालण्यात आल्या होत्या. दरोडेखोर ज्याप्रमाणे धाडी घालतो, दरोडे घालतो त्याप्रमाणे अधिकाऱ्यांनी या संस्थांची तपासणी रात्रीच्या वेळी केली. आश्रमशाळा तपासणीच्या संदर्भामध्ये मला एक मुद्दा असा मांडायचा आहे, की शिक्षण खातं ऑडिट करत असतं; परंतु समाजकल्याण खात्याकडून या आश्रमशाळांचं ऑडिट केलं जात नाही. आश्रमशाळा सुरू करण्याच्या संदर्भातली सरकारची ही योजना अतिशय चांगली असताना देखील या योजनेला अधिकाऱ्यांनी बदनाम केलेलं आहे. संस्था चालवणं आणि आश्रमशाळा मिळवणं, हा जणू काही धंदा होऊन बसला आहे! या आश्रमशाळा वाईट पद्धतीनं चालवल्या जातात, इतकंच नव्हे तर त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार होतो.

शासनाने १९७८ साली एक परिपत्रक काढून जवळजवळ चौदा-पंधरा आश्रमशाळा बंद करण्याचा निर्णय घेतला होता. तेव्हा आश्रमशाळेच्या बाबतीत अशा प्रकारे अन्याय केला जातो. या आश्रमशाळांची रात्रीच्या वेळी तपासणी करण्यात आली होती. वास्तविक, आश्रमशाळांमध्ये शिकणारी मुलं लहान असतात. ही मुलं आपल्या आई-वडिलांना भेटण्यासाठी एका दिवसासाठी जाऊ शकतात, ही बाब समजून घ्यायला पाहिजे होती; परंतु त्यांचा काहीही विचार न करता तांड्यावर ज्याप्रमाणे पोलीस रात्रीच्या वेळी धाडी घालतात, त्याप्रमाणे या आश्रमशाळांची तपासणी रात्रीच्या वेळी करण्यात आली होती. ही बाब चीड आणणारी आहे.

या आश्रमशाळेच्या इमारतीसाठी पूर्वी पाचशे रुपये अनुदान दिलं जात होतं. आता एक हजार रुपये अनुदान दिलं जातं. होस्टेलच्या इमारतीसाठी मात्र काहीही तरतूद केली जात नाही. याकरता लागणारी जमीन खरेदी करण्यासाठी फक्त पाच हजार रुपये दिले जातात. जमिनीच्या किमती वाढलेल्या असल्यामुळे पाच हजार रुपयांमध्ये एक गुंठादेखील जमीन विकत घेता येत नाही, अशी परिस्थिती आहे. तेव्हा पाच हजार रुपयांमध्ये या सर्व कामासाठी लागणारी जमीन समाजकल्याण खात्याच्या अधिकाऱ्यांनी व मंत्रिमहोदयांनी घेऊन दाखवावी. पाच हजार रुपयांमध्ये जमीन खरेदी करता येत नसल्यामुळे शासनाने ही जमीन खरेदी करून द्यावी, असं मला या ठिकाणी सांगायचं आहे. शेतीची अवजारे घेण्यासाठी पाचशे रुपये दिले जातात; परंतु पाचशे रुपयांमध्ये एक औतसुद्धा येत नाही. बैलजोडी खरेदी करण्यासाठी पाचशे रुपये दिले जातात. त्यामध्ये बैल-खरेदी करता येत नाही. बैलगाडीची किंमत पाचशे रुपये दिली आहे आणि गाय-खरेदीसाठी तीनशे रुपये अनुदान दिलं आहे. खेळाच्या साहित्यासाठी शंभर रुपये अनुदान देत आहेत. परवाच मी एक व्हॉलिबॉल आणि त्याचं नेट खरेदी केलं. त्या बॉलसाठी मला दीडशे रुपये मोजावे लागले आहेत; पण इथे मात्र हे समाजकल्याण खातं या साऱ्या साहित्यासाठी मिळून केवळ शंभर रुपये अनुदान देत आहे. म्हणजे, आम्ही आता व्हॉलिबॉल घ्यायचा, नंतर पुढच्या वर्षी नेटसाठीचा एक पोल घ्यायचा, त्यानंतर दुसरा पोल घ्यायचा आणि त्यानंतर नेट घ्यायची. अशा प्रकारे खरेदी करायची, अशी शासनाची अपेक्षा आहे काय? या आश्रमशाळांमध्ये मुलांची संख्यासुद्धा एकशेवीस इतकी मर्यादित ठेवली आहे. हे १९५३ सालचे आकडे आहेत आणि त्या काळात,

मला वाटतं, ते बरोबर होतं; कारण त्या काळी लोकांना तेवढी जाणीव नव्हती, शिक्षणाविषयी जागृती नव्हती; पण आता या लोकांमध्येही शिक्षणाविषयी जागृती झाली आहे, आदिवासींची मुलंही शिक्षण घेऊ इच्छितात. अशा वेळी त्यांच्या संख्येवर बंधनं घालणं बरोबर नाही; परंतु आपण ही संख्या मर्यादित एक रेक्टर, एक शिक्षक असं बंधन घातलं आहे. म्हणजे, सत्तर मुलं असतील तरच त्यांना रेक्टर ठेवायला परवानगी आहे. आता इतकी मुलं एका रेक्टरनं सांभाळायची, त्यांचं जेवणखाण वगैरे सर्व पाहायचं या सगळ्या गोष्टी अशक्य आहेत. कमीत कमी दोन माणसं तरी त्यासाठी द्यायला पाहिजेत. इतकंच काय, पण आश्रमशाळांमध्ये स्वच्छता ही गोष्ट सुद्धा तितकीच महत्त्वाची आहे आणि त्यासाठी एका स्वतंत्र माणसाची नियुक्ती करणं आवश्यक आहे, असं माझं स्पष्ट मत आहे.

मी स्वत: एक संस्था चालवत आहे, म्हणून मला याची चांगली माहिती आहे. सरकार जे अनुदान देतं त्यातून काहीच होत नसल्यानं संस्थेच्या निधीतून व्यवस्था करून आम्हाला तिथं रेक्टर ठेवावा लागतो. तरीही आमचे समाजकल्याण अधिकारी आले की म्हणतात, ''हजेरी बुकं नीट ठेवली नाहीत, रजिस्टरं नीट ठेवली नाहीत,'' तेव्हा, हा अन्याय आहे. एकशेवीस मुलं हे बंधन कशासाठी? तिथे अडीचशे मुलं राहिली, शिकली तर आपली काय हरकत आहे? मी हे समजू शकतो की, त्या संस्थेची कुवत नसेल तर ती गोष्ट वेगळी; पण एखाद्या संस्थेची जास्त मुलं घेण्याची, सांभाळण्याची कुवत असेल तर त्याला आपली हरकत कशासाठी?

तेव्हा, या संदर्भातला १९७०चा जो आपला जी.आर. आहे तो अगदी चुकीचा आहे, अन्यायकारक आहे. तो बदलला पाहिजे. आपण या जी.आर.नुसार ग्रंथालयासाठी दीडशे रुपये अनुदान म्हणून दिलं आहे. आता या पैशामध्ये एक तरी ग्रंथ येऊ शकतो काय? आज लहान लहान पुस्तकांच्याही किमती वाढलेल्या आहेत, याची आपणास कल्पना आहे. फर्निचरसाठी पावणेदोनशे रुपये अनुदान दिलं जातं. आता या इतक्या कमी पैशांमध्ये खुर्चीचा एक पाय तरी येऊ शकतो काय, याचा आपण विचार करावा. त्यापेक्षा मी तर अशी सूचना करीन, की आपण असे पैसे देण्यापेक्षा ते सगळं साहित्यच या संस्थांना घेऊन द्यावं, म्हणजे प्रश्न मिटेल. तीस मुलांच्या युनिटमागे स्वयंपाक आणि त्यासाठीच्या भांड्यांसाठी पाचशे रुपये दिले जातात. ही तर अगदीच थट्टा

झाली.

आमच्या मंत्रिमहोदयांनी संसाराला अजून सुरुवात केलेली नाही. त्यामुळे त्यांना याची कल्पना नसेल; पण त्यांनी संसार थाटून पाहावा. म्हणजे त्यांच्या लक्षात येईल,की भांडी घेणंसुद्धा किती अवघड आहे. संडास, मुतारी, बाथरूम बांधण्यासाठी तीनशे रुपये अनुदान दिलं आहे. त्यामध्ये त्याच्या विटासुद्धा येणार नाहीत. आज एकेका विटेची किंमत प्रत्येकी एक रुपयापेक्षाही जास्त आहे. अशा परिस्थितीत तीनशे रुपयांमध्ये संडास, मुतारी-बाथरूमचं बांधकाम होणार कसं, याचा आपण विचार करावा. तसंच, शैक्षणिक साहित्यासाठी दरवर्षी एका मुलामागे दोन रुपये आणि जास्तीत जास्त दोनशेचाळीस रुपये दिले जातात. त्यापेक्षा वर एक पैही दिली जात नाही. तसंच, मुलांना वर्षातून दोन गणवेशांसाठी प्रत्येकी चाळीस रुपये दिले जातात. मला वाटतं, आज त्यांच्या शिलाईसाठीसुद्धा यापेक्षा जास्त पैसे द्यावे लागतात. या चाळीस रुपयांत एक पॅन्टसुद्धा येणार नाही. मला वाटतं, सरकारी अधिकाऱ्यांनी तरी या किमतीमध्ये हे कपडे मिळवून दाखवावेत. त्यांच्या घरात मुलंबाळं असतील की नाही! या कपड्यांसाठी त्यांना किती पैसे लागतात, याचा तरी त्यांनी विचार करावा. आपल्या मुलाच्या एका चड्डीला किती पैसे लागतील ते विचार करून त्याप्रमाणे त्यांनी पैसे द्यावेत; पण नाही, त्यांनी ही सारी थट्टा चालवली आहे. बेडिंगसाठी तीन वर्षांतून प्रत्येकी साठ रुपये दिले जातात. मला तर यावेळी खरोखर खूप राग आलेला आहे. काय बोलू नि काय नको, असं झालं आहे! आता, सरकार आपलंच आहे हे बरोबर आहे; पण आपलं आहे म्हणून जास्तच चिडायला पाहिजे. साठ रुपयांत बेडिंग ही काय चेष्टा आहे! बाबा आदमच्या काळातले हे आकडे आहेत. यामध्ये आपण दुरुस्ती करणार आहात की नाही?

भोजनाबाबत सांगितलं आहे. प्रत्येक विद्यार्थ्यामागे दरमहा सव्वाशे रुपये आणि विद्यार्थिनीमागे एकशेतीस रुपये दिले आहेत. प्रत्यक्षात ही रक्कम दहा महिन्यांसाठीच देण्यात येते. आज आपण खानावळीचे दर पाहिले तर आपल्याला असं दिसून येईल, की राईस प्लेटसाठी एका व्यक्तीमागे दरमहा अडीचशे ते तीनशे रुपये लागतात. विद्यार्थ्यांना दूध, अंडी व फळं द्यायची असल्यास त्यापेक्षाही जास्त रक्कम लागते. विद्यार्थ्याला भाकरी, आमटी आणि एक भाजी जरी द्यायची म्हटलं तरी अडीचशे रुपये दरमहा लागतात. इतक्या कमी रकमेत आम्ही आश्रमशाळा कशा काय चालवायच्या? या सगळ्या आश्रमशाळा

आपण चालवायला घ्याव्यात, आमचं काहीच म्हणणं नाही. सरकारी शाळेतल्या एका विद्यार्थ्यामागे पाचशे ते सहाशे रुपये खर्च येतो आणि आपण तो सव्वाशे रुपये देत आहात. या रकमेमध्ये एका वेळचंसुद्धा जेवण देऊ शकत नाही. अशा परिस्थितीतून नंतर या संस्था निरनिराळ्या मार्गांचा अवलंब करतात. सरकारच त्यांना भ्रष्टाचार करायला भाग पाडतं; कारण कोणीही स्वत:च्या घरातून रक्कम आणून या आश्रमशाळा चालवणार नाही. या आश्रमशाळांकडे कोणीही अजूनपावेतो डोळसपणानं पाहिलेलं नाही.

इमारतींच्या भाड्याबाबतदेखील अशीच तक्रार आहे. आपण शंभर रुपये भाडं देत आहात. फलटण, बारामती, सातारा या ठिकाणी एक खोलीसुद्धा शंभर रुपये भाड्यानं मिळत नाही. आपला या बाबतीत असा जी. आर. आहे, की इमारतीच्या भाड्यापोटी जास्तीत जास्त शंभर रुपये दिले पाहिजेत. इतर संस्थांना आपण जास्त भाडं कसं देता? कॉलेजच्या इमारतींना, तसंच मेडिकल कॉलेजच्या इमारतींना जास्त भाडं कसं देता? हा पैसा अधिकारी आणि मंत्री काही आपल्या खिशातून देत नाहीत. सरकारच्या तिजोरीतला हा पैसा आहे. या संदर्भात आपण सर्व मिळून मुख्यमंत्र्यांकडे जाऊ या. त्यांना आपण आपलं म्हणणं सांगू या. आज आपण इमारतीसाठी शंभर रुपये - पन्नास रुपये हे जे भाडं देत आहात ते बरोबर नाही, ही नुसती थट्टा चालली आहे. औषधोपचारांसाठी दरवर्षी दोन रुपये मिळतात. दोन रुपयांत वर्षभर काय काय करायचं! ॲनासिनच्या गोळीचीच किंमत किती आहे! माझं तर म्हणणं असं आहे, की आश्रमशाळा आपण बंद करून टाका... (अडथळा)... मुलं जशी आजारी पडतात तसंच आपणही एक दिवस आजारी पडाल, म्हणजे आपल्याला दोन रुपयांची किंमत समजेल. वर्षाला आपण दोन रुपये देत आहात, यामध्ये साधी मलमपट्टीसुद्धा येत नाही.

काल या सभागृहात एड्सवर चर्चा चालली होती. मी ती लक्षपूर्वक ऐकली आहे. त्यावेळी नुसता थयथयाट चालला होता. विषय जर श्रीमंत माणसांबद्दलचा असेल तर थयथयाट आणि गरिबांना दोन रुपये मिळतात त्याबद्दल काहीच नाही, याचाही विचार केला पाहिजे. गरिबांची ही थट्टा आपण थांबवली पाहिजे. आश्रमशाळेतल्या मुलांना पिण्याचं पाणी लागत नाही, अशी शासनाची समजूत असावी; कारण आश्रमशाळेतल्या मुलांना पिण्याचं पाणी मिळावं, यासाठी विहीर खोदण्यासाठी कोणत्याही प्रकारची मदत मिळत नाही.

त्यासाठी कोणत्याही प्रकारची तरतूद नाही. अशा परिस्थितीत त्या शाळेतल्या संचालकांनी विद्यार्थ्यांना पाणी कुठून द्यायचं? पिण्याचं पाणी देण्यासाठी, विहीर खणण्यासाठी पैसे कुठून आणायचे? माझा, या ठिकाणी पैसा द्या असा मुळीच आग्रह नाही. विहीर खोदून दिली तरी चालेल; परंतु आश्रमशाळेतल्या विद्यार्थ्यांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था झाली पाहिजे. तसंच, या आश्रमशाळेत महिन्यातून एकदा तरी सिव्हिल सर्जन गेला पाहिजे आणि त्यानं विद्यार्थ्यांची तपासणी करून औषधोपचार केला पाहिजे. या ठिकाणी सिव्हिल सर्जननं जायचं नाही, मुलांना तपासायचं नाही, आणि एखादा विद्यार्थी मरण पावला तर आपण या ठिकाणी कावकाव करायचं, हे बरोबर नाही. याला काहीच अर्थ राहत नाही. आता, या आश्रमशाळेला खडूची आवश्यकता असेल तर हा खडू शिक्षकांनी आपल्या पगारातून आणायचा काय? किरकोळ वस्तूंसाठी आपण पैसे देत नाही, अनेक प्रकारच्या लहानसहान सोई व सवलती आपण या आश्रमशाळांना देत नाही.

आपण इमारतींच्या भाड्याकरता शंभर रुपये दिले आहेत. आठवले साहेब, आपण त्या ठिकाणी येऊन पाहा. या इमारतीचं भाडं पाच हजार रुपयांपर्यंत असतं. तेव्हा, माझी मागणी एवढीच आहे, की आपण हा संपूर्ण जी.आर. बदला. आजच्या महागाईच्या काळातली आकडेवारी गृहीत धरून महागाईचा निर्देशांक काढला जावा. नाहीतर सर्व संस्थाचालकांच्या वतीनं मी या ठिकाणी सांगतो, की या आश्रमशाळा तुम्ही चालवायला घ्या, आमची त्याबाबत काही तक्रार नाही. नाहीतर अनुदानामध्ये वाढ करा आणि त्यांची होत असलेली उपेक्षा थांबवा. आमच्या समाजावर हा अन्याय चालला आहे. त्याबाबत काही आकडे दिले तरी ते आपल्या लक्षात येईल.

या सर्व गोष्टी पाहता या लोकांना शिक्षण देण्याची जबाबदारी समाजकल्याण खात्याची आहे. त्याकरता वेगळा शिक्षण विभाग नाही. त्याकरता वेगळा ऑडिटचा स्टाफ नाही. या शाळा बंद करण्यात आल्या आहेत, याचं प्रमुख कारण म्हणजे मुलं गैरहजर असतात. मुलं गैरहजर असतील तर आपण जरूर शाळा बंद करा. त्याबद्दल तक्रार नाही; परंतु शाळा-तपासणीचे काही निकष ठरवणार आहात की नाही? आपण अचानक त्या शाळांना भेटी देता. त्याबद्दलही आमची हरकत नाही; परंतु अचानक रात्री १२ वाजता शाळेला भेट देता. आपण अशी विचित्र वेळ निवडून काढली आहे. जसे काही, गुन्हेगारांचे तांडे

पडले आहेत असं आपण समजता. हे बरोबर नाही. ही गरीब माणसांची चेष्टा चालली आहे. महाराष्ट्राच्या समाजकल्याण मंत्र्यांना मी सांगतो, की तुमच्या काळात मोठ्या प्रमाणात निर्णय घेतले गेले पाहिजेत. तुम्ही चळवळीतून आलेले आहात. आतापर्यंतच्या मंत्र्यांना त्यांच्याबद्दल फार आच नसेल; परंतु तुमची परिस्थिती तशी नाही. तुम्ही आणि मी काल-परवापर्यंत रस्त्यावर घोषणा देणारी माणसं! कदाचित उद्याही घोषणा देऊ. नाहीतर मला इथं उभं राहून तुमच्याविरुद्ध घोषणा देण्याची पाळी येईल, असं करू नका. संस्थाचालक गुन्हेगार आहेत; सरकारचे कायदे त्यांना गुन्हेगार समजतात, समाज त्यांना गुन्हेगार समजतो. निदान, समाजकल्याण खात्यानं तरी त्यांना गुन्हेगार म्हणू नये. तिथं जाणाऱ्या अधिकाऱ्यानं नीटपणे जावं. अधिकारी त्या ठिकाणी अशा पद्धतीनं वागतात. त्यामुळे शासनाची शान राहत नाही. सरकारला त्यांच्यातला भ्रष्टाचार खरोखर निपटून काढायचा असेल तर त्यासाठी आपली स्वतंत्र यंत्रणा निर्माण करा आणि त्यांचे हिशोब खुशाल तपासा. ते जर बोगस हिशोब ठेवत असतील तर त्यांच्यावर कारवाई करा. तुम्ही त्या सर्वांना गुन्हेगार समजत असाल तर ते तुमच्या डोक्यातून काढून टाका.

दुसरी गोष्ट अशी, की त्यांच्या मुलींच्या शिक्षणाचं काय करणार? या संपूर्ण समाजातल्या मुलींच्या शिक्षणाची अतिशय उपेक्षा झाली आहे. मुलांना जितके पैसे देता, त्याच्या दुप्पट पैसे मुलींच्या शिक्षणासाठी दिले पाहिजेत. तिसरी गोष्ट अशी, की मुलांचे जे पालक असतात त्यांची अशी अवस्था असते की, ते आज या गावात तर उद्या दुसऱ्या गावात असे भटकत राहतात. आपल्या मुलांना शाळेत सोडून ते निघून जातात. त्यांच्या पालनपोषणाची, शिक्षणाची जबाबदारी शासनावर आहे. तेव्हा, त्यांच्या पालकांनाही आपण काहीतरी इन्सेन्टिव्ह दिलं पाहिजे. आता तर अशी परिस्थिती आहे, की मुलांच्या ॲडमिशन बंद झाल्या असं प्रत्येक वेळी सांगितलं जातं. मग त्या केव्हा सुरू होतील! मुख्यमंत्री हे आमच्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. त्यांनी सांगितले की, एकाही मुलीला शाळेमध्ये ॲडमिशनपासून वंचित ठेवणार नाही. गेल्या वर्षी आमच्याकडे पन्नास मुलांची क्षमता असताना सत्तर मुलं घेतली होती. आम्ही कुणालाही नाही म्हणू शकत नाही. आम्ही संस्थाचालकांना सांगितलं आहे, की कोणत्याही समाजाचा मुलगा आपल्याकडे शिकायला आला तर त्याला घरी जा असं सांगण्याची पाळी येऊ देऊ नका; परंतु या

सरकारने जी.आर.आणि कायदे असे करून ठेवले आहेत, की सरकारी अधिकारी त्या कागदावर बोट ठेवतात आणि सांगतात, की तुम्हाला इतक्या क्षमतेपर्यंत परवानगी आहे, त्यापुढे नाही. मी म्हणालो, की त्या क्षमतेच्या आत मुलं असतील तर आपण माफ करता काय? तसं असेल तर तुम्ही सांगता, की तुम्हाला चाळीस मुलांची ग्रॅन्ट आहे, तुमच्याकडे वीसच मुलं आहेत. आमच्याकडे पन्नास मुलांची क्षमता असताना आम्ही सत्तर मुलं सांभाळतो. तुम्ही वरच्या वीस मुलांची ग्रॅन्ट देणार काय? त्यावेळी अधिकारी कानावर हात ठेवतात व सांगतात, की ते आमच्या अधिकारात नाही.

मंत्रिमहोदय, आपल्या तर हातात आहे! आपण फक्त आकडे बदला. मी पुन्हा एकदा मुलींच्या शिक्षणाबाबत विनंती करतो, की आपण सव्वाशे रुपये देता ती रक्कम अडीचशे रुपये करावी. शक्य असल्यास तीनशे रुपयेही जाहीर करा. तीनशे रुपयांच्या पुढे गेलात तरी चालेल, परंतु एवढं पुरे. मुलींसाठी महिन्याला पन्नास रुपये भत्ता द्या. त्यांच्या फार कटकटी असतात. त्यांच्या डोक्यात उवा झाल्या तर घरच्या लोकांच्या फार कटकटी असतात. आम्ही सर्व मुलींची डोकी शनिवारपर्यंत स्वच्छ करतो.

शनिवारी मुलीची आई येते आणि मुलीला घेऊन जाते. दोन दिवस ठेवून घेतल्यानंतर तिसऱ्या दिवशी पुन्हा येताना उवा देऊन जाते. त्यामुळे सोमवारी पुन्हा मुलीच्या डोक्यात औषध टाकावं लागतं. उवा मारण्याच्या या बाटलीची किंमत सतरा रुपये आहे. प्रत्येक आठवड्याला बाटली घ्यावी लागते.

महाराष्ट्र सरकार आमच्यासारखंच भिकारी आहे की काय हे समजत नाही. सरकारच्या तिजोरीत पैसे नाहीत काय? मुलांना सुकट खाण्यास मंजुरी मिळत नाही. मुलांना तर सुकट, बोंबील खाण्यास पाहिजे असतात. म्हणून, आश्रमशाळांचं संपूर्णपणे आधुनिकीकरण करण्याची गरज आहे. मंत्रिमहोदयांकडून मला ही अपेक्षा आहे. ते मला निराश करणार नाहीत आणि मी सांगितलेले मुद्दे मान्य करतील अशी अपेक्षा करून मी माझं भाषण पूर्ण करतो.

११.८.१९९०

◆

नवी संहिता... नवा आशय...

विजय

भा. द. खेर



नियतीचे फासे, कधी पडतात उलटे... पण नियती आणि मूल्य यांच्यातील संघर्षात जिंकतं कोण? विजय, नीला, अरविंद की निर्मला? भावनिक संघर्षाचं चित्रण करणारी उत्कंठावर्धक कादंबरी

किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

स्मृतिसुगंध

भा. द. खेर

इंदिरा गांधी, ना. सी. फडके आदी नामवंतांच्या भा. द. खेरांना लाभलेल्या सहवासातून दरवळलेला स्मृतिसुगंध



किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध

पुस्तकाच्या पानांतून



बंद दरवाजा

लक्ष्मण माने

भटक्या विमुक्तांच्या भळभळत्या जखमांचं आणि त्यासाठी उभारलेल्या चळवळीचं अभ्यासपूर्ण विश्लेषण

अंधारातून प्रकाशाकडे

रामदास अडके तसा माजा लहानपनापासनंचा दोस्त. शिडशिडीत अंगाचा, रामकाठीवानी नुस्ता ढोल उंच. रंगानं काळासावळा, नाकाडोळ्यानं तरतरीत, उंची जरा अधिक, त्याला पाठीत किंचित बाक आल्याला. रामदासकडं बगितलं, की काबाडकष्ट करणारा, करपलेला चेहरा, आन् एकूणच काटकपणा, राकटपणा लक्षात येतो. आला की उभ्या वाऱ्यासंगं येतो. जल्माची तकतक मागं लागलेली.

आजही तो तसाच आला व्हता. "रामुसवाड्यावर बैठक ठिवतोया. समदी तयारी मी केलीया. परवाच्या दिशी दोनपारचाच ये. लई दिस झालं, आपले लोक तुला आणाया पायजे, म्हण मागं लागलेत. नाई म्हणायचं नाई. दोपारचाच ये. म्हंजी समदं

जमून ईल.''

रामदास तसा भटक्या-विमुक्तांच्यातला चांगला कार्यकर्ता. आता सरकारी नोकरीत कामाला. समाजासाठी काही करावं ही खूप इच्छा; पण घरचं खाऊन लोकांच्या कुपाटाच्या काट्या कशाला वडायच्या म्हण खाली मान घालून चारचौघांसारखा राबणारा, बायका-पोरांत रमणारा, चारचौघांत मिसळणारा. रामदास पेपरातली बातमी वाचून कामाला लागलेला असतो. हक्कानं घरी येऊन सांगून जातो. घरातलं जायच्या आधी तासभर स्वयंपाकघरात शशीला ऐकवून गेलेला असतो. येतो वाऱ्यासारखा अन् जातोही वाऱ्यासारखा. दुसऱ्या दिवशी पुना सांगावा असतोच. म्हणून मी यल्लपाला बरोबर घेऊन 'रामुसवाड्यावर' पोहोचतो.

पाच-पन्नास घरांचा 'रामुसवाडा' ध्यादुपारा वस पडल्याला असतो. समद्या घरान्ला कुलपं. पोरं कानापल्याली. काई-बायी झाडाच्या शेंड्यावर चढून शिट्ट्या मारत असत्यात. काय-बाय पोरं गोट्यांचा डाव खिशात घालून फाटक्या आंगरट्याच्या लांबड्या भाईनं नाकं पुशीत, कमरंखाली घसारल्याली चड्डी वर वडत, तुटाक, कानपून उभी असत्यात.

तर जरा मोठेवाड पोर आपसांत म्हणतं, ''शिब्र्या दूतिवल्या कारं?''

दुसरा म्हणतो, ''दांडाळ्या आलाय.''

''शिब्र्या कुठल्या, वैतायला जाया पायजे.''

तिसरा मधेच म्हणतो, ''टांगवाला दांडाळ्या टैरा दिसतोय.''

बारीक, मोटी सारीच पोरं खो-खो मोठ्यानं हसाया लागत्यात.

मी त्याच भाषेत विचारतो, ''शिब्र्या कुणी दूतवल्या रं? एऽऽ बाताड्यांनो रामदास नाईक कुठं आसंन रे?''

पोरं आता चपापली. आपली सारी बोली ह्याला समाजतीया, माणूस आपल्यातलाच दिसतोया ह्यो हिसाब करून जरा जवळ आली. ''रामदास्या कंचा? इटूबाचा का भुजाबाचा?'' एक पोरगा जरा नेटानं विचारतो.

''भुजाबाचा.'' मी म्हणालो.

''त्यो सांचा ईल, कामाला गेलाय.'' ''पोरं दांडाळ्या कुणाला म्हणत्यात?'' यल्लपा मला विचारतो.

मी म्हणालो, ''दांडाळ्या म्हंजी? उराप्या- उराप्या म्हणजी, कुलवाडी-आपल्या बाहीरचा. 'शिब्र्या' म्हंजी-भाकरी, 'टैरा' म्हणजे-काना-तिरळ्या डोळ्याचा,

'टांगवाला' म्हंजे-सडसडीत. त्यो तुला म्हणतोय.''

तर पोरं मोठ्यानं हसत असत्यात. मी रामदासचं घर गाठतो. दारातच एक म्हातारी बसल्याली आसती. मी पटकन ओळखतो. ती रामदासची आजी. नजर उलीकशी कमी आल्याली असती. मी जवळ जाऊन रामदासबद्दल इचारतो. तर म्हातारी आंगाला लावून घिना. मी नाव सांगितलं तरी उपेग न्हाय. मग डोक्यात येतं, आपलं डोस्कंबी भारीच की! ''मी आन् कैकाडणीचा थोरला पोरगा लक्षा.''

''आगं बया! केवदानला रं झालायस! माजी नजार आता आंदुकलीया. बस, बस बाबा, कशी हायेतर आनू, बापू, पोरं-लेकरं?''

''बरी हायती. रामदाश्या कुठं गेला?'' मी. ''त्यो व्हय? आसंन तिकडं वड्याला. त्याच्या सासऱ्याचं रसायन बगाया गेला आसंन.''

मी खानाखुना पटवून घेऊन वड्याला निगालू. मीटिंग सांची असती. येळ बराच असतो, म्हण वडा गाटला. सीताबायच्या डोंगरातनं निगाल्याला घाण्यारीचा वाकडातिकडा नागसपेटीवडा करवंदीच्या, घाणेरीच्या ताफ्यानं तरारून उठल्याला असतू, वड्याच्या दोन्ही कडंला नुसती काट्यांच्या झाडांची 'खैची' झाल्याली असती. बाजूनं काटेरी झुडपांचं बन, त्याला घाण्यारी आन् कावळीच्या, निळूंबीच्या येलानं नुसतं जकडल्यालं असतं. तर ध्या दुपारचं झाडवनात नुसतं किर्रर्रऽऽऽ झाल्यालं असतं. मधीच एकांद्या जाळीवर धुराचं लोट निघत असत्यात. त्याच्यावरनं वळकायचं असतं, त्या जाळीत भट्टी लागलीया. आसपास माणसं दबा धरून असत्यात. पोलिसवाला न्हायतर कुणीबी दांडाळ्या असला, की इशारं होणार. माणूस बगून म्होरचं ठरणार, तर जवळ जाऊन मी मोठ्यानं परवलीचा शब्द म्हणतो. तसं जरा कुनबून कानावर येती. बिबळ्या बाहिर निगावा, तसा एक जवान पोरगा बाहीर निघतो. मी यल्लपाला सांगितलेला परवलीचा शब्द आम्ही दोघं म्हणतो. आन् वड्याच्या त्या कडंला आमाला तो घेऊन जातो. तीन-चार चुलवानं ढणढणत असत्यात. रसायनाची डबडी, पराती, स्टो, चुलीची लाकडं, नारळाच्या कवट्या, काड्यापेट्या, फुटाणे आन् सटारफटार चिल्लर सामान पडलेलं असतं. रामदासाच्या सासऱ्याचा हातभट्टीचा कारखाना असतो. रामदास सरपान आणायला गेलेला. आमची इकडची तिकडची बोलनी चालू असत्यात, तवर त्यो येतो.

आमाला बगताच त्याला आनंद होतो; पण नको तिथं आलास म्हणत त्यो

जवळ येऊन बसतू. मला गप्पा मारायच्या असत्यात निवांत, तर त्याला कसनुसं होत असतं.

गप्पा सुरू केल्या तवर दोन डबं उतराय आल्यालं. वाटलं, आपणबी जावं जरा पानीबीनी मारायला; पण पुन्हा रामदासला बरं वाटणार न्हाय म्हण बसलो. यल्लापाला सारं नवंच होतं. त्यात त्यो जरा घाबरलेला. तेव्हा रामदासला इचारलं, ''रामदास, पावण्याला पोलिसाचं भ्या वाटतया.''

''पावनं, भ्याचं काम न्हाय. पोलिसाचा 'बा' बी हातं येणार न्हाय आन् आला तरी काय करणार न्हाय.''

त्याचा सासरा मधीच माहिती पुरावतो, ''पावणं, आमी काय शिकल्याली न्हाय. पर बामन 'पांडव-प्रतापा'त एक गोष्ट सांगतू भीमाची आन् बकासुराची. त्या गोष्टीवानी हाये बगा. 'गाडीबर अन्न, एक रेडा आन् एक मानूस बकासुराला द्याया लागायचा. तसं आता आमचं हाय.' आमाला पोलीस खातं म्हणजी बकासुरच हाय बगा. महिन्याला पाचशे रुपयांचा हप्ता. त्याजशिवाय रावंडातलं पोलिसान्ला आन् त्याच्यासंगं येत्याल त्या मानसान्ला प्यायला, पयल्या धारंची,फुकाट. दोन महिन्यांतनं एकदा रसायन जप्त आन् सहा महिन्यांतनं एकदा पंचनामा, आन् मंग महिना-दोन महिनं सजा. तर आसं समद्या रामूस आळीला सूत लागल्याली हाय. तवा बिनघोर बसा. हप्ता मातर चुकला की आलीच बलामत.''

दारू आणि तिच्यासंबंधीच्या गप्पा संपल्या आन् मी विषय काढायचा म्हण उमाजी नाईकावर घसरतो. तसं एका इतिहासाला सुरुवात झाली. रामदासचा चुलता आन् सासरा म्हंजी बोलाय नुसता फुटाण्यावाणी. लाह्या फुटाव्या तसं शाहिरी थाटात बोलाय लागले. उमाजी नाईक आणि त्याचं बंड, त्याच्या अपार पराक्रमाची वर्णनंही न शिकलेली, आंगटाबहादूर माणसं अशा बहारीनं सांगत असत्यात, की जसं शाहिरांचं पोवाडं गातोय. उमाजी नाईक हा पहिला क्रांतिकारक; पण म्हारा-मांगांनी, रामुशांनी, वैदांनी, कैकाड्यांनी केलेलं बंड म्हणजे दरोडेखोरी किंवा पेंढाऱ्यांचा उठाव, असा आपला इतिहास!

तर रामदासचा चुलता सांगत असतो त्याचा इतिहास. म्हणजे, जसा सध्या प्रसंग घडतोय आणि त्या सगळ्या प्रसंगांना हा पठ्या साक्षी आहे असा!

''पर उमाजी नाईक तसा नेकीचा. शब्दाचा पक्का. त्याजं सारं भांडण इंग्रजांसंगं व्होतं. ही पांढऱ्या पायांची मेंढरं आमच्यावर कसलं राज्य करणार,

म्हण त्यो इंग्रजांसंग लढला. आकिरी इस्वासघातानं गेला. भनीनंच इसवासघात केला बगा. न्हायतर त्याजं जंगलातलं राज टिकलंच आसतं आन् त्यानं इंग्रजाला घालवलं असतं,'' वगैरे.

तर शत्रूच्या गोटातनं बातमी आणणारे बहिर्जी नाईक, हिरोजी फर्जंद, छत्रपती शिवरायांचे खंदे बहादूर, तर ब्रिटिशांविरुद्ध १८५७च्या लढाईत मारले गेलेले सातारचे चितरसिंग बेरड, खानदेशातला पयाजी नाईक, दिनो नाईक, भीमा नाईक यांनी इंग्रजांचा अनेकदा पराभव केला, तर पुण्याला उमाजी नाईक, सत्तू नाईक यांनी भांबुर्ड्याची तिजोरी कशी लुटली – रामदासचा चुलता त्याच्या तरुणपणात हे सारे पवाडे गायचा.

तर तो सांगत असतो, ''रामुशी, नाईक, नायकवाडी, तलवार, बेरड, बेडर, वाल्मीकी, वाल्मीकी नायक, वाल्मीकी मक्कलू अशी नावं. रामुशी जातीची काही ठिकाणं आहेत; तर रायचूर गुलबर्ग्याला ते संस्थानिक होते. त्यांना द्वरेर (राजा), द्वेरे, मक्कलू (राजपुत्र) तर आदिलशाहीत तलवार बक्षीस मिळाली म्हणून ते 'तलवार' झाले. चिंच दुर्गा सिमोड्याला ते वसूल करत असल्याने ते पाळगार बनले. काही ठिकाणी ते बेडर कन्नप्पाचे भक्त म्हणून ते कन्हैयाने मक्कलू. म्हैसूरला राजघराण्याशी संबंध म्हणून राजपरवीर, तर नागपूरकरांच्या पदरी असलेले नाईक-नायकवाडी झाले.''

सारा इतिहास तोंडपाठ. आपलाच इतिहास कच्चा, त्याला काय करणार?

दारूच्या भट्टीवरली सारी मंडळी ऐकत असतात. गडी क्वचित रंगात येत असावा. त्याचा आपल्या जातीचा अभिमान ऊर भरून वाहत होता. ब्रिटिशांशी टक्कर कशी दिली आन् बायाबापडी कशी आशीर्वाद देत होती, ते बायकांच्याच आवाजात सांगे. शिदनाक म्हाराची फितुरी कशी झाली आणि उमाजीनं मध्येच त्याचं शिर कसं उडवलं, आणि मराठेशाहीच्या अत्यंत विपन्नावस्थेत उमाजी नाईक हा मोठा हिराच अल्पकाळ चमकून गेला. या हिऱ्याने आपल्या तेजानं त्या काळातला निबीड अंधार किंचित काळ दूर सारला. त्याच्या तोडीचा सेनानायक नव्हता. स्वत:बद्दल निरिच्छ; पण शत्रूला कर्दनकाळ! त्यानं देशासाठी सर्वस्वाचं बलिदान केलं. इंग्रजांनी या बेडर लोकांना खूप छळलं. त्यांना देशद्रोही, चोर, लुटारू, दरोडेखोर, खुनी ठरवून सेटलमेंटमध्ये टाकलं. १८४३ मध्ये त्यांची वतनं खालसा केली. त्यांना हत्यारबंदी केली. तरी १८५७च्या बंडात त्यांनी मोठा उठाव केला. त्याची शिक्षा म्हणून १८७१ साली 'क्रिमिनल

ॲक्ट' पास करून बेरडांच्या पायांत गुलामीच्या बेड्या ठोकल्या. त्यांना दिवसातून चार वेळा हजेरी लावली. त्यांना गुन्हेगार ठरवून त्यांच्या पुढच्या साऱ्या पिढ्या नष्ट केल्या.

''अठराशे सत्तावनच्या(१८५७च्या) बंडात केलेल्या कामगिरीची यांना मोठी बक्षिसी मिळाली. अनन्वित छळ, उपासमार, बेकारी, पराभूत अवस्था, लाचारी आणि भूक मागे लागली आणि रामोशी नाईक पोटासाठी चोऱ्या करू लागले; पण नसीब बगा! या देशात जातीवर समदं ठरतंया. क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडक्यांच्या बरोबर त्यांचा सेनापती दौलत रामोशी फाशी गेला. त्याचं नावं तरी माहीत आसतं का? आसं का व्हावं? क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके हे क्रांतिवीर होतेच; पण त्यांच्याबरोबर खांद्याला खांदा देऊन त्यागात जराही कमी न पडणारे बेरड, रामोशी मात्र गुन्हेगार, दरोडेखोर, असा इतिहास का सांगावा? असहकाराच्या चळवळीत फार मोठी कामं आमच्या लोकांनी केली. इंग्रजांना एकाकी टक्कर देणारी वीर सिंदूर लक्ष्मण, (१९२०) चिकळदिनी, गुंडप्पा (१८९०) अशी कितीतरी नावं तात्या (रामदासचा चुलता) सांगत असतो. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्र, सारा रामोशी जमातीचा इतिहास सनावळ्यांसह तो तोंडपाठ सांगत असतो. ''आमची पोरगी नाचली की तमाशा, आन् त्यांची पोरगी नाचली की डिस्कू का काय म्हणत्यात ते! सायब, अशी लई रत्नं मातिआड घातलीत. आपुन जागं तर दिसणार ना! पर जातीचा अभिमान कुठंय?''

आता समदीच उठत्यात, की माजी सैनिक पेन्शन घेत्यात. क्रांतिकारक म्हण त्यांचं पुतळं दिसत्यात. आता मला आसा घोड्यावर बसल्याला आन् इंग्रज हापीसराचं शिर तलवारीला लावल्याला 'उमाजी'चा पुतळा कुठं आक्क्या दुनियात दावता का?''

''तात्या, बरं आजचं काय? आमचे पूर्वज लई पराक्रमी होते ते कळलं पर आता काय गत हाय बोला.''

''सायब, मोलाच्या पोटी केरसुण्या, दुसरं काय! पर जमाना येगळा व्हता बगा. आपले लोक लई पराक्रमी. थोरल्या महाराजांच्या काळात आपल्या लोकान्ला इनामं, वतनं दिली व्हती. मॉप दिलं व्हतं. म्होरं मुसलमान आन् इंग्रजांच्या संगं लढले. त्यांनी समदं लुटलं. इंग्रज-मुसलमान वैरी झाले आन् 'चोर लोकांची' म्हण आपल्या माणसांनीच तापल्या तव्यावर पोळी भाजली.

सायब गाव नाय, गावकुस नाय, शेत नाय, वाडी नाय, पोटापाण्याचा धंदा नाय, काय करावं?

सायब, काय सांगू? एकेक परसंग असा असतू, की इचारू नका. दाताचं पाणी गिळत बसतू. पोरा-लेकरान्‌ला निबत नाय, आतडं तुटायला लागलं, पोरं अन्नासाठी रडाया लागली म्हणजे काय सुचत नाय बगा. घावंल ते वरबडायचं बगा. घावशेल-पावशेल, भंडारा उधळल्यावाणी उधळायचा. मंग भट्ट्या चालू दे, रोज मिळू दे, नायतर आणखी काय व्होऊ दे. पॉट लई वंगाळ हाय, सायब. ते भरलं नाही की काय वाट्टेल ते कराय लावतंय. मग आब्रूची आसू दे, गरतीची असू दे, सकी असू दे, निकी असू दे; वाळल्यासंगं वलं जळतया. कुणी चोऱ्यामाऱ्या करत्यात. कुणी उचलपाचल करतंय. समदी सारखी कशी असत्याल? पण पोलीस समद्यान्‌लाच चोर म्हणत्यात.''

''पण दरोडा कसा घालायचा ते जरा सांगा की'' मी.

तात्या जरा वेळ गप्प बसतो. ''आता कशाचा दरोडा घालता सायब? हाता-पायांच्या मुळ्या कवाच ढळल्या आन् माणूसबी लई हुशार झाला. आता सांदी- कोपऱ्यात कशाला काय ठिवतंया? टरंका गेल्या, उतरंडीबी गेल्या. कुठं राहिल्यात सुगडंगाडगी? ठेसंला पोलिस, आन् माणूस असतंया. त्यात आता गावगना बँका निगाल्या, सोसायट्या निगाल्या. माणूस लई हुशार झालाय. कशाचा दरोडा घालता? आता लयंच झालं तर चार शेतांतली कनसं-बिनसं कुणी कुणी आणत असत्याल; पण दरोडा म्हण कुणी आपल्यात तरी घालत नाय. चोराला का जात आसती व्हय? सायब, दारुड्याला जात नसतीया तशी चोरालाबी नसतीया; पण आपल्या कपाळावर सटवीचा टिका, त्याला का करावं?''

''तात्या, पण दरोड्याच्या काही जुन्या आठवणी आसतीलच की.'' तात्या पुन्हा एक चुटका सांगायला लागतो. रामदास चुलीला जळाण घालतो.

''आमी एका गावात गेलो होतो. दहा-पंधरा गडी होतो. दरोड्याचं असं असतंया. काय गड्यांनी नुसतं आंदारात रापायचं, काय गड्यांनी भिंतीला भॉक पाडायचं. काय जणांनी आत उतरायचं आन् काय लोकांनी राकान करायची असते. तर काय झालं, मी आंधारात उभा. माझा हात बगितला?'' तात्या हात दाखवतो. तो डावा हात जरा वाटकोळा असतो. ''तर ह्या हातानं मी गोफन भिंगरीवाणी फिरवायचो. एका टिपिऱ्यात आडवं झालं पायजे. आता गोफण

फिरवतो, पर ताण गेला. दगड लांब जात नाय. तवा तरणा व्हतो. नेम असा असायचा, की गुंडा म्होरनं येणाऱ्यांच्या आकाळात बसायचा, की माणूस आडवा! तर मी राकाण करतो. म्होरनं माणसं यायला लागली. कालवा झाला. बाया-पोरांची ओरड चालू झाल्याली. तेवढ्यात मी चार गडी निजावल्यालं. घरात उतारलेल्या गड्यान्ला सामान लांबवायला इशारा करतोय, तर ही बेनी नुसती गप्पच! बरं, म्होरं मारा कमी करावा, तर आपला जीव जातोय. आखीर आई-भनीवरनं शिव्या हासाडल्या तवा समदीजण अंधारातनं पशार झाली. तसा मीबी जमिनीसंग आडवा झालो. आसा रांगलो, की इचारू नका. पावंडं तर उठला नाय पायजे, माग तर घावला नाय पायजे. आन् आपला जीव तर निसटला पायजे. त्याला म्हणत्यात बहाद्दर. मोठ्या वगळटीत आलो तर हे दात काढत बसल्यात. दोघा-तिघांनी खारका खायला सुरुवात केलीया. म्या इचारलं तर म्हणत्यात कसं, जरा कळ काढली असतीस तर काय मेला असतात व्हयं लेका? बाळांतणीचं घबाड व्हतं घबाड. आक्का डेरा बरल्याला व्हता. नुसतं तूप, साकार अन् खारका. नुसती मजा व्हती. हाताला घावंल तेवढं वरबाडलं म्हणत मलाबी दोन खारका दिल्या.

''तर गोफन चालवू जाणं म्याच. आमचा इठल्या भिंती चढायला लई पटाईत. फट्या टाचनं भित चढायचा. थकला आता. अजूनबी चढतो.''

मी जरा आश्चर्य वाटून पुन्हा विचारलं. तात्या म्हणाला, ''सांचं चढून दावू का? आवं ती कला हाय. कोलाटीन तारंवर नाचतीया, तसं आमी पाठीनं भित चढतू. म्हंजी तोंड म्होरं राहतं. जीव बिनधुन्या ऱ्हातो. उडी तर किती वरनं मारावी सांगा. मांजरावाणी पायावरच पडीन आन् किरान घ्यायला सांगा,परुसभर भिंतीवरनं ताड दिसती हाणावाणी उडून जाईन.''

◆

अभिप्राय

‘महासम्राटा’चा ‘झंझावात’



‘इतिहास वाचून माणूस बेभान होतो, भानावर येतोच असं नाही,’ हे (बहुधा) वि. ग. कानेटकर यांचे विधान मला कायमच महत्त्वाचे वाटते.

प्रकाशनास काही महिने लोटले असले तरी निवांत वेळ काढून वाचायची म्हणून बाजूला ठेवलेली ज्येष्ठ कादंबरीकार विश्वास पाटील यांच्या ‘महासम्राट’ या कादंबरी मालिकेतील ‘झंझावात’ ही कादंबरी हातात घेतली आणि तिने झपाटून गेलो. ही कादंबरी बेभानही करते आणि एक भानही देते, हे तिचं वैशिष्ट्य आहे.

विश्वासरावांची शैली आणि त्यांची शब्दसंपत्ती यावर नवे काय बोलणार? पण ही कादंबरी उभ्या देशाचे आराध्य दैवत असलेल्या छत्रपती शिवरायांच्या आयुष्यातील घटनांचे केवळ चमकदार कथन यापुरती मर्यादित न राहता तत्कालीन सामाजिक व राजकीय परिसराचे भान देणारी ठरते.

तेव्हाचा काळ बारीकसारीक तपशिलांसह उभा करते. ती छत्रपतींच्या तेजस्वी कर्तृत्वाला मुजरा तर करतेच; पण त्यासोबत त्यांच्या जन्मापूर्वीची राजकीय परिस्थिती, त्यातून आईसाहेबांच्या मनात उगवलेल्या हिंदवी स्वराज्याच्या अत्यंत अवघड, जवळजवळ अशक्यप्राय स्वप्नाच्या पाठलागाची वेगवान घडामोड चितारते.

मुघलांचे डावपेच, खेळ्या नेस्तनाबूत करण्यामागची ‘अत्यंत योजनाबद्ध आखणी’ मांडत

जाते.

ही कादंबरी माझे त्या काळाबद्दलचे आकलन वाढवते.

मऱ्हाटी मुलखातला तत्कालीन निसर्ग यात येतो, तत्कालीन नातेसंबंध, समाजधारणा आणि परचक्राच्या दडपणाखालची उलघाल, यांतून त्या काळाचा पट मांडला जातो आणि इथेच कादंबरी केवळ एका युगपुरुषाचे चरित्रकथन न राहता एका शतकाचा लेखाजोखा होऊन जाते. वेगळेपण आहे ते हेच की, ही कहाणी महाराक्षसी लाटांविरुद्ध पोहून जात महासागरालाच बांधून घालणाऱ्या चिवट आशावादाची आणि या स्वप्नाला प्रत्यक्षात उतरवणाऱ्या बुद्धिचातुर्याची होत जाते.

म्हणूनच ती एकाच वेळी बेभानही करते आणि भानही देते.

कादंबरी संपते एक स्वल्पविराम देत...

आता पुढचे भाग... त्याची अधीरता आणि उत्सुकता...

डोळे दिपून जावेत अशा थोर व्यक्तिमत्त्वाचे चित्रण हे शिवधनुष्य होते, जे लीलया पेलले आहे...

यात रेखाटलेली चित्रे अप्रतिम आहेत... घराघरांत भक्तिभावाने ठेवावा आणि 'अभ्यासावा' असा हा 'झंझावात' आहे...

– अभिराम भडकमकर

डॅमइट आणि बरंच काही

'डॅमइट आणि बरंच काही' हे महेश कोठारे यांचं मंदार जोशी यांनी संपादन-शब्दांकन केलेलं आत्मचरित्र यशापयशाच्या लपंडावाची अनोखी कलाकृती आहे. या चरित्रग्रंथाचं, 'संस्कार, संघर्ष, कौटुंबिक जिव्हाळा आणि बरंच काही' असं वर्गीकरण करता येईल. आपल्या हातून झालेल्या चुकांची प्रांजळ कबुली व त्यांची उशिरा जाणीव झाल्यानं मनाला लागलेली बोचणी या आत्मकथनात कोणताही अभिनिवेश न बाळगता मांडली आहे; त्यामुळंच ते वेगळं ठरतं.

मानवी जीवनात संस्कारांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. एखादा मोहाचा



क्षण, अतिशय प्रतिकूल स्थिती किंवा आयुष्याला कलाटणी देणाऱ्या एखाद्या निर्णायक वेळी संस्कारांचा कस लागतो; पण सुसंस्कार कोणत्याही संकटातून, संघर्षातून सुखरूप बाहेरच काढतात. कोठारे यांचं आत्मचरित्र वाचताना याची वेळोवेळी प्रचिती येते. बालकलाकार म्हणून यशोशिखरावर असताना, डोक्यात हवा जाऊ न देता अगदी सामान्य मुलांप्रमाणे वर्तन करण्याच्या, त्यांच्याप्रमाणेच बसनं शाळेत जाण्याच्या आई-वडिलांच्या शिकवणीत खऱ्या अर्थानं कोठारे यांच्या दीर्घ कारकिर्दीचं गमक दडलं आहे. याशिवाय शिक्षणाचं माहात्म्य जाणून पैसा व प्रसिद्धीच्या मागं न धावता मुलानं त्याच्या शालेय सुट्टीतच चित्रपटात काम करावं, हा मापदंड आजच्या पिढीतील मुलं आणि पालकांसाठी दिशादर्शक ठरावा असाच! शिक्षणाच्या या ध्यासानंच अभिनय क्षेत्रात कार्यरत असतानाही कोठारे यांना वकिलीच्या पदवीपर्यंत नेलं व सहा वर्षं याच वकिलीनं अर्थार्जनासाठी हात दिला.

राजेश खन्ना, मनोजकुमार, संजीवकुमार, बलराज साहनी, रमेश देव, ओमप्रकाश, प्राण, शर्मिला टागोर, नूतन, निरुपा रॉय, सुलोचनादीदी, ललिता पवार, ताराचंद बडजात्या, प्रभाकर पेंढारकर, दादा कोंडके ते लता मंगेशकर आणि आशा भोसले यांसारख्या तत्कालीन दिग्गजांच्या प्रतिभावलयात वावरण्याची नियतीनं दिलेली संधी पाहता, कोठारे यांचा उमेदितील प्रवास सरळ-सुलभ होणं अपेक्षित होतं. नंतर त्यांच्या नशिबानं आणि पर्यायानं कारकिर्दीनं घेतलेली कलाटणी अनपेक्षित आणि एखाद्या प्रवाही चित्रपटातील अनाहूत वळणाप्रमाणं आहे. नेमके इथेच संस्कार उपयोगी आले व प्रचंड जिद्द, कोणत्याही गोष्टीचा अखेरपर्यंत पाठपुरावा करण्याचा स्वभावगुण आणि अखंड मेहनतीची तयारी या त्रिसूत्रीच्या जोरावर ते यशस्वीपणे पुढे आले. यशापयशाचा हा हिंदोळा त्यांच्या सातत्याने पाठीमागे राहिला व त्यांनी वेळोवेळी याच त्रिसूत्रीच्या साह्यानं संकटं पार केली. या प्रवासात त्यांनी 'सिनेमास्कोप' पासून ते 'थ्रीडी'पर्यंतच्या अनेक आधुनिक बाबी मराठी चित्रपटसृष्टीला दिल्या.

बहुतांश प्रसिद्ध व्यक्तीच्या यशात कुटुंबाचा फार मोठा वाटा असतो.

कोठारेही याला अपवाद नाहीत. त्यांना आई-वडिलांनी तत्त्व, स्वाभिमान आणि संस्कारांचं लिंपण देत आकार दिला. पुढं पत्नीनं तितकीच समर्थपणे साथ दिली. आपल्या पतीनं वकिली सोडून अभिनय करावा व त्याला आपण 'फिल्मफेअर'ची बाहुली हातात घेताना पाहावं, हे स्वप्न त्यांनी पाहिलं नसतं तर कोठारे यांनी कदाचित वकिली सुरू ठेवली असती. जीवनात चूक न केलेला माणूस अपवादानंही सापडणार नाही. इतरांप्रमाणं कोठारे यांच्याकडूनही काही चुका झाल्या. या चुकांवर सोयीस्करपणे पांघरूण न घालता त्याबाबतची स्वच्छ कबुली त्यांनी या आत्मचरित्रात दिली आहे. याशिवाय कटू अनुभव कथन करताना अनेकदा त्यांनी संबंधितांची नावे टाळली आहेत, हे कौतुकास्पद आहे. 'डॅम इट' ही महेश कोठारे यांची जणू ओळखच. त्यांनी अभिनय केलेल्या चित्रपटात हा संवाद असायचाच. हे शब्द मुखी कसे आले, याचा किस्सा पुस्तकात नसेल तर त्यास पूर्णत्व प्राप्त होणार नाही. कोठारे यांचा हा पुस्तकरूपी जीवनप्रवास ठेवणीतला बहुपेडी दस्तावेज ठरावा. प्रवीण दवणे यांची दिलखुलास प्रस्तावना व आत्मचरित्राचा अतिशय मार्मिकपणे करण्यात आलेला शेवट, यादेखील पुस्तकाच्या जमेच्या बाजू आहेत.

– लहू सरफरे

◆

१६ जुलै ते १५ ऑगस्ट २०२३ दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

खालील संचांवर १६ ते ३१ जुलै दरम्यान खास सवलत

१६ जुलै - जॅकलिन गोल्ड यांचा जन्मदिन
'अ वुमन्स करेज' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-

---

१७ जुलै - अर्ल स्टॅन्ले गार्डनर यांचा जन्मदिन
'द केस ऑफ द केअरलेस क्यूपिड', 'द केस ऑफ द काउंटरफिट आय', 'द केस ऑफ द क्रिमसन किस', 'द केस ऑफ द क्रुकेड कँडल', 'द केस ऑफ द डेडली टॉय', 'द केस ऑफ द डेम्यूर डिफेन्डन्ट', 'द केस ऑफ द हॉन्टेड हसबन्ड', 'द केस ऑफ द हाऊलिंग डॉग', 'द केस ऑफ द आइस-कोल्ड हॅन्ड्स', 'द केस ऑफ द लकी लूझर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत २०९०/- । सवलत किंमत १४४९/-

---

१७ जुलै - डॉ. प्रमोद जोगळेकर यांचा जन्मदिन
डॉ. प्रमोद जोगळेकर यांनी अनुवाद केलेल्या सत्तावीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९८१५/- । सवलत किंमत ६८७१/-

---

१८ जुलै - लॉरेन स्क्रग्ज यांचा जन्मदिन
'एक लढा असाही...' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-

---

१९ जुलै - सूर्यकांत जाधव यांचा जन्मदिन
'आघात', 'अस्मिता' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ७००/- । सवलत किंमत ३९९/-

---

१९ जुलै - स्नेहलता जोशी यांचा जन्मदिन
'अजून नाही जागी राधा', 'द मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट','दडलेला इतिहास' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ११५५/- । सवलत किंमत ७१०/-

२० जुलै - डॅनियन ब्रिंकली यांचा जन्मदिन
'सीक्रेट्स ऑफ द लाइट' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १३८/-

२० जुलै - पोलेत बूर्ज्वा यांचा जन्मदिन
'फ्रँकलिन मालिका (२९ पुस्तके)' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८७५/-

२१ जुलै - माधवी देसाई यांचा जन्मदिन
'असं म्हणू नकोस', 'धुमारे', 'हरवलेल्या वाटा', 'कांचनगंगा', 'कथा सावलीची', 'किनारा', 'मंजिरी', 'नियती', 'प्रार्थना', 'सागर', 'शुक्रचांदणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १६७०/- । सवलत किंमत १०८६/-

२१ जुलै - अर्नेस्ट हेमिंग्वे यांचा जन्मदिन
'घणघणतो घंटानाद' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ५५०/- । सवलत किंमत ३५८/-

२१ जुलै - मायकेल कॉनेली यांचा जन्मदिन
'सिटी ऑफ बोन्स' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २२९/-

२२ जुलै - धनंजय बिजले यांचा जन्मदिन
'लढा लोकपालचा... उद्रेक आम आदमीचा', 'अण्णा हजारे : भ्रष्टाचाराच्या विरोधातील भारतीय लढ्याचा चेहरा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-

२३ जुलै - जीतेंद्र दीक्षित यांचा जन्मदिन
'३५ दिवस : २०१९ने दिली महाराष्ट्राच्या राजकारणाला कलाटणी', 'महाराष्ट्रातील महाबंड', 'लाल बर्फाचे खोरे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ९३०/- । सवलत किंमत ५६१/-

२५ जुलै - स. शं. देसाई यांचा जन्मदिन

'अखेरची लढाई', 'महापर्व', 'पहिले जागतिक महायुद्ध', 'दुसरे जागतिक महायुद्ध' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १०७०/- । सवलत किंमत ६६९/-

२८ जुलै - आशा बगे यांचा जन्मदिन

'निसटलेले', 'पाऊलवाटेवरले गाव', 'प्रतिद्वंद्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २७९/-

२८ जुलै - कॅरोल हिगिन्स क्लार्क यांचा जन्मदिन

'झॅप्ड' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत १०९/-

२९ जुलै - तिमिरी एन. मुरारी यांचा जन्मदिन

'द तालिबान क्रिकेट क्लब' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत २१४/-

२९ जुलै - करेन रोझ यांचा जन्मदिन

'स्क्रीम फॉर मी', 'डाय फॉर मी', 'आय कॅन सी यू' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १९७५/- । सवलत किंमत ११२६/-

२९ जुलै - प्रभाकर परांजपे यांचा जन्मदिन

'काळोखाचे थेंब', 'पत्रकारितेची मूलतत्त्वे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १६७/-

२९ जुलै - जे.आर.डी. टाटा यांचा जन्मदिन

'जेआरडी टाटा यांची पत्रं', 'कीनोट : जे.आर.डी. टाटा', 'टाटा – एका कॉर्पोरेट ब्रँडची उत्क्रांती', 'जेआरडी : एक चतुरस्त्र माणूस' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ११८०/- । सवलत किंमत ७३९/-

३० जुलै - नरेन्द्र मोहन यांचा जन्मदिन

'कमबख्त निंदर' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-

३० जुलै - डॉमिनिक लॅपिए यांचा जन्मदिन

'फ्रिडम ॲट मिडनाइट' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-

३१ जुलै - जे. के रोलिंग यांचा जन्मदिन

'हॅरी पॉटर आणि मृत्युदेवतेच्या भेटी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ५९९/- । सवलत किंमत ४१९/-

खालील संचांवर १ ते १५ ऑगस्ट दरम्यान खास सवलत

१ ऑगस्ट - हर्मन मेलव्हिल यांचा जन्मदिन

'शिस्तीचा बळी', 'पाचूचे बेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत २३१/-

१ ऑगस्ट - रॉबर्ट जेम्स वॉलर यांचा जन्मदिन

'अद्वैत' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २२१/-

२ ऑगस्ट - दिपा महानवर यांचा जन्मदिन

'विमुक्ती' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १०१/-

२ ऑगस्ट - कॅरोल ओ'कॉनर यांचा जन्मदिन

'यशस्वी नेतृत्व' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत १७०/- । सवलत किंमत ११९/-

३ ऑगस्ट - लिऑन युरिस यांचा जन्मदिन

'एक्झोडस' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ३३९/-

४ ऑगस्ट - राजीव तांबे यांचा जन्मदिन
'बब्बड मालिका भाग १', 'बब्बड मालिका भाग २', 'बंटूचा टिक टिक मित्र', 'ससोब-हसोबा मालिका भाग १', 'ससोबा-हसोबा मालिका भाग २', 'अजब डोंगर आणि इतर कथा', 'राजाचा घोडा आणि इतर कथा', 'फुले फुलली आणि इतर कथा' या सर्व संचांवर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १६९०/- । सवलत किंमत ११८३/-

४ ऑगस्ट - लीना दामले यांचा जन्मदिन
'अंतरिक्षाच्या अंतरंगात', 'कथारूपी खगोलशास्त्र', 'अशक्य भौतिकी', 'नाते ब्रह्मांडाचे' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत १२५०/- । सवलत किंमत ८१३/-

४ ऑगस्ट - रिचर्ड प्रेस्टन यांचा जन्मदिन
'मायक्रो', 'द डेमन इन द फ्रीजर', 'द हॉट झोन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९७०/- । सवलत किंमत ५७९/-

५ ऑगस्ट - डेव्हिड बॉल्डाची यांचा जन्मदिन
'द सिम्पल ट्रूथ', 'सेव्हिंग फेथ' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९४०/- । सवलत किंमत ५६९/-

५ ऑगस्ट - टॉड बर्पो यांचा जन्मदिन
'स्वर्गाचा साक्षात्कार' या पुस्तकावर विशेष सवलत
मूळ किंमत १९५/- । सवलत किंमत ११९/-

६ ऑगस्ट - हिरोशिमा / परमाणू दिन
'वॉर्सा ते हिरोशिमा', 'नागासाकी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
संचाची मूळ किंमत ९५०/- । सवलत किंमत ६०८/-

७ ऑगस्ट - ग्रेग चॅपल यांचा जन्मदिन
'फिट फॉर ५०+ फॉर मेन' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ८०/- । सवलत किंमत ५९/-

७ ऑगस्ट - जागतिक मैत्री दिन

'चौघीजणी', 'मित्र जोडा आणि लोकांवर प्रभाव पाडा', 'फाईव्ह पॉइंट समवन', 'द थ्री मिस्टेक्स ऑफ माय लाईफ', 'एक होता मित्र', 'दोस्त', 'अदान ॲण्ड ईव्हा', 'मैत्री अशी आणि तशी...', 'बेधुंद' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत २२२५/- । सवलत किंमत १४२४/-

८ ऑगस्ट - वैशाली कार्लेकर यांचा जन्मदिन

'विक्रम वेताळ मालिका भाग १', 'विक्रम वेताळ मालिका भाग २', 'विक्रम वेताळ मालिका भाग ३' या तीन भागांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ८२०/- । सवलत किंमत ५४१/-

८ ऑगस्ट - सारा ड्युनांट यांचा जन्मदिन

'सेक्रेड हार्ट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४००/- । सवलत किंमत २७९/-

८ ऑगस्ट - शंकर पाटील यांचा जन्मदिन

'आभाळ', 'बंधारा', 'भेटीगाठी', 'धिंड', 'गारवेल', 'घालमेल', 'इल्लम', 'जुगलबंदी', 'कथा अकलेच्या कांद्याची', 'खुळ्याची चावडी', 'खुशखरेदी', 'लवंगी मिरची कोल्हापूरची', 'पाटलांची चंची', 'पाऊलवाटा', 'फक्कड गोष्टी', 'शापित वास्तू', 'श्रीगणेशा', 'ताजमहालमध्ये सरपंच', 'टारफुला', 'वळीव', 'वावरी शेंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ३०७०/- । सवलत किंमत १५३५/-

१० ऑगस्ट - फुलनदेवी यांचा जन्मदिन

'मी फुलनदेवी' या पुस्तकावर विशेष सवलत

मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत २६९/-

११ ऑगस्ट - वि. स. वाळिंबे यांचा जन्मदिन

'नेताजी', 'वॉर्सा ते हिरोशिमा', 'वुइ, दि नेशन', 'वुइ, दि पीपल' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १७२०/- । सवलत किंमत १०८४/-

१३ ऑगस्ट - आचार्य अत्रे यांचा जन्मदिन

'आचार्य अत्रे बारा गावचं पाणी', 'काँग्रेस विरुद्ध महाराष्ट्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत ४४०/- । सवलत किंमत २७३/-

१३ ऑगस्ट - डॉ. अनिल गांधी यांचा जन्मदिन

'अफलातून मेंदू', 'मना सर्जना', 'धन्वंतरी घरोघरी', 'संजीवनी उच्च तंत्रज्ञानाची', 'युद्ध कोरोनाशी', 'गुंतवणुकीची कामधेनू' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १५५०/- । सवलत किंमत ९३०/-

१५ ऑगस्ट - स्वातंत्र्य दिन

'भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील स्त्रिया', 'फ्रीडम ॲट मिडनाइट', 'मोहनदास', 'परमवीरचक्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

संचाची मूळ किंमत १९१०/- । सवलत किंमत ९५५/-

◆

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाइल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्सॲप नंबरवर कळवावी.

९४२०५९४६६५

मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित आणि लक्ष्मण माने लिखित 'विमुक्तायन', 'उद्ध्वस्त' आणि 'यशवंतराव चव्हाण : आठवणी-आख्यायिका' या पुस्तकांचे प्रकाशन करताना डावीकडून साहिल मेहता, मा.लक्ष्मण माने, मा.डॉ.श्रीपाल सबनीस, मा.अरुण खोरे आणि मा.मनोहर सोनवणे.

डॉ. संजय ढोले लिखित 'राफिणू' या बाल-विज्ञान कादंबरीचे अभिनव पद्धतीने प्रकाशन

'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023

RNI. No. MAHMAR/2000/02739

Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.

Publication Date : 11/07/2023 Posting Date : 11/07/2023

आवर्जून वाचावे...

मेहता मराठी ग्रंथजगत

१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति, _____

_____

_____

_____

_____

_____

_____